CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १५ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ९२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## केतन अग्रवालच्या आईचे थेट नरेंद्र मोदींना पत्र

पुणे : पुण्यात हत्या झालेल्या रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या आई राखी अग्रवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भावनिक ईमेल पाठवत मुलाच्या हत्येप्रकरणी न्याय मिळवून देण्याची आणि दोषींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे.

या पत्रात राखी अग्रवाल यांनी आपल्या वेदना व्यक्त करत, एक दिवस स्वतःच्या मुलासाठी न्याय मागण्यासाठी पंतप्रधानांना पत्र लिहावं लागेल, अशी कल्पनाही कधी केली नव्हती, असे म्हटले आहे. प्रत्येक आईप्रमाणे मी केतनचं उज्ज्वल भविष्य, त्याचं लग्न आणि आमच्यासोबतचं आयुष्य पाहण्याचं स्वप्न पाहिलं होतं. पण त्याऐवजी मला माझ्याच मुलावर अंत्यसंस्कार करावे लागले, अशी हळवी भावना त्यांनी व्यक्त केली. केतनची हत्या अत्यंत क्रूर असल्याचे सांगत, त्याच्या मृत्यूमुळे कुटुंबात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले. केतन गेला, त्या दिवशी माझं जगच संपलं. घरातील प्रत्येक कोपरा, त्याची खोली, कपडे आणि फोटो आजही त्याची आठवण करून देतात, असे त्यांनी पत्रात लिहिले आहे.

## बन यांची राऊतांवर टीका

मुंबई : नवनाथ बन यांनी संजय राऊतांवर जोरदार टीका केली. पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले जनाब संजय राऊत तुम्ही आता 'संपत राऊत' झालेले आहात याचे भान ठेवा. भाजपा अडचणीत नाही तर उबाठा गट अडगळीत पडला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी , अमितभाई शहा, तसेच महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाची वाटचाल अतिशय सुरळीतपणे सुरू आहे. आमचे प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण सर्व निर्णय घेण्यासाठी अतिशय सक्षम आहेत. त्यामुळे भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेनेत काय चाललेय हे शोधण्यापेक्षा आपल्या अडगळीत पडलेल्या पक्षाकडे लक्ष द्या, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी केला.

## श्रीरामाच्या नावाने आता शिक्षणातही घोटाळा

भोपाळ: अयोध्येतील राम मंदिरातील देणगी चोरीचं प्रकरण ताजं असताना, त्याबद्दल रामभक्तांमध्ये संताप असताना आता श्रीरामाच्या नावानं झालेला एक गंभीर घोटाळा समोर आला आहे. बीएड आणि शिक्षक प्रशिक्षण कॉलेजांचं कागदांवरील साम्राज्य उघडकीस आलं आहे. भाजपची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये अनेक कॉलेज शेतांमध्ये, ओसाड जागांवर नोंदणीकृत आहेत. तिथे गेल्यावर दिसणारी परिस्थिती वेगळीच आहे.

# देवेंद्र फडणवीस ठरले सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदी राहणारे तिसरे नेते..!

तभा वृत्तसेवा




मुंबई : मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी एकूण २ हजार ४३० दिवस पूर्ण केल्याने सर्वाधिक काळासाठी मुख्यमंत्रिपद भूषविणाऱ्यांच्या यादीत ते आता तिसऱ्या क्रमांकावर विराजमान झाले आहेत. माजी मुख्यमंत्री शरद पवार यांना मागे टाकत फडणवीस या क्रमांकावर पोहाचले आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यानिमित्ताने मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे. शरद पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून सहा वर्षे आणि २२१ दिवसांचे म्हणजेच एकूण २ हजार ४१२ दिवसांचे कामकाज हाताळले होते. १२ जुलै रोजी फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून एकूण सहा वर्षे सात महिन्यांचा कालावधी पूर्ण केला आहे. हा कालावधी एकूण २ हजार ४३० दिवसांचा होतो. या निमित्ताने रवींद्र चव्हाण यांनी फडणवीस यांची भेट घेत त्यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

फडणवीस यांनी यापूर्वीच वसंतदादा पाटील, पृथ्वीराज चव्हाण, मनोहर जोशी, शंकरराव चव्हाण यांना मागे टाकले होते. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा २ हजार ६८६ दिवसांचा तर वसंतराव नाईक यांचा ४ हजार ९६ दिवसांचा कार्यकाळ राहिला आहे. भविष्यात फडणवीस यांनी देशमुख यांचा हा कार्यकाळ मागे टाकल्यास ते दुसऱ्या क्रमांकावर पोहोचतील. देवेंद्र फडणवीसांचा मुख्यमंत्री पदाचा १२ जुलै पर्यंतचा कार्यकाळ असा आहे. : पहिला - ३१ ऑक्टोबर २०१४-१२ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत १,८३९ दिवस दुसरा-२३ नोव्हेंबर २०१९ - २८ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत ६ दिवसआणि तिसरा - ५ डिसेंबर २०२४ - १२ जुलै २०२६ या कालावधीत ५८५ दिवस, असे त्यांनी आतापर्यंत एकूण २ हजार ४३० दिवस पूर्ण केले आहेत.

## म्हाडाची ५ हजार घरांची मेगा लॉटरी लवकरच

तभा वृत्तसेवा

मुंबई : स्वतःच्या हक्काच्या घराची वाट पाहणाऱ्या लाखो नागरिकांसाठी मोठी आनंदाची बातमी आहे. म्हाडाच्या कोकण मंडळामार्फत सुमारे ५ हजार घरांची मेगा लॉटरी लवकरच जाहीर होणार असून, ऑगस्टच्या अखेरीस किंवा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात या लॉटरीची जाहिरात प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. या लॉटरीत ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल आणि वसई-विरार परिसरातील घरे उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात घर खरेदी करण्याची मोठी संधी मिळणार आहे.या लॉटरीतील मोठ्या प्रमाणातील घरे खासगी विकसकांकडून २० टक्के गृहनिर्माण धोरणाअंतर्गत म्हाडाकडे हस्तांतरित झाली आहेत. सध्या म्हाडाकडे जवळपास १,००० घरे उपलब्ध असून,ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल आणि वसई-विरार परिसरातून आणखी सुमारे ४,००० घरे उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.यापूर्वी म्हाडाच्या मुंबई मंडळाने २,६४० घरांसाठी लॉटरी काढली होती. या लॉटरीसाठी तब्बल ७५ हजार अर्ज प्राप्त झाले होते. मात्र, घरांच्या तुलनेने जास्त किमतींमुळे अपेक्षित प्रमाणात प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे आता नागरिकांचे लक्ष कोकण मंडळाच्या आगामी लॉटरीकडे लागले आहे.मुंबई आणि उपनगरांतील घरांच्या सातत्याने वाढणाऱ्या किमतीमुळे स्वतःचे घर घेणे अनेकांसाठी कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत म्हाडाची लॉटरी ही परवडणाऱ्या किमतीत घर मिळवण्याची मोठी संधी मानली जाते.आता लॉटरीची अधिकृत घोषणा, अर्ज प्रक्रिया, घरांच्या किमती आणि आरक्षणाची माहिती कधी जाहीर होते, याकडे घर खरेदी करू इच्छिणाऱ्या नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## समृद्धी मार्गावर पत्नीची निर्घृण हत्या

तभा वृत्तसेवा

वाशिम : समृद्धी महामार्गावर पत्नीच्या हत्येची एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. उत्तर प्रदेशातील गौतमबुद्ध नगर (नोएडा) जिल्ह्यातील कलवर्धा गावातील ३० वर्षीय सलमान खान नेक मोहम्मद खान याने पत्नी २८ वर्षीय हसीनबानो सलमान खान हिची हत्या केल्याप्रकरणी कारंजा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्राथमिक तपासात पत्नीच्या चारित्र्यावर संशयातून ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सलमान खान हा पत्नी आणि तीन लहान मुलांसह कारने समृद्धी महामार्गावरून प्रवास करत होता. समृद्धी महामार्गावर पती-पत्नीमध्ये वाद झाल्यानंतर आरोपीने लोखंडी रॉडने पत्नीच्या डोक्यावर वार केल्याचा आणि त्यानंतर गळा आवळून तिची हत्या केली असल्याचं आरोपी पतीने सांगितलं आहे. घटनेनंतर आरोपी पत्नीचा मृतदेह कारमध्ये ठेवून अनेक तास समृद्धी महामार्गावर फिरत राहिला. अखेर पहाटेच्या सुमारास तो स्वतः कारंजा शहर पोलीस ठाण्यात हजर झाला आणि पत्नीची हत्या केल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी कारमधून महिलेचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित केले असून, आरोपीला ताब्यात घेण्यात आला आहे.

# एल निनोमुळे मान्सूनचा लहरीपणा...
# कधी मुसळधार पाऊस, तर कधी उन्हाचा चटका !

तभा वृत्तसेवा

मुंबई : जुलै महिन्यात महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी खरीपाची पेरणी करतात. महिन्याच्या सुरुवातीला मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा दिला. शहरातील धरणांमधील जलसाठाही भरला. पण दुसऱ्या आठवड्यात पावसाने दडी मारली. शिवाय संपूर्ण आठवडा पाऊस होणार नाही असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची ३०-४० टक्के तूट आहे तर काही जिल्ह्यांमध्ये ५०-७० टक्के तूट आहे. जुलैच्या सुरुवातीला पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झालं होतं. पण आता मोसमी वाऱ्यांना चालना देणारी कोणतीही प्रणाली सक्रिय नाही. प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाला आहे. जुलै महिन्यात तो आणखी तीव्र होणार होता. परिणामी १०-१५ जुलैपर्यंत उत्तर, पश्चिम आणि मध्य महाराष्ट्रात मोसमी वाऱ्यांचा प्रभाव कमी झाला. याशिवाय मॅडेन-ज्युलियन ऑसिलेशनचा(चगज) मान्सूनवर मोठा प्रभाव झाला आहे. ४ जून रोजी मान्सून केरळमध्ये दाखल झाला. त्यानंतर मोसमी वाऱ्यांचा वेग मंदावला आणि ९ जुलैपर्यंत देशभर व्यापला. मान्सूनच्या संथ गतीमुळे जून महिनाही कोरडाच होता. मान्सूनपूर्व पावसाचीही देशात तूट होती. जुलैची सुरुवात होताच ही परिस्थिती पूर्णपणे बदलून गेली. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने मुसळधार पाऊस सुरू झाला. यामुळे अनेक धरणांमधील पाणीसाठा वाढला. पण त्यानंतर पावसाने पुन्हा उघडीप दिली. पाऊस सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप पिकाची लागवडकेली. ही पिकं पावसावर अवलंबून राहतात. पिंकाची वाढ होताना मातीत सतत ओलावा असणं गरजेचं असतं. त्यासाठी पावसाची गरज असते. पणी गेले अनेक दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यामुळे पिकांचं भविष्य धोक्यात येऊ शकतं. हवामान तज्ज्ञांच्या मते, या मागे कारण म्हणजे एल निनो. एल निनोमुळे साधारणतः भारतीय उपखंडातील आर्द्रतायुक्त वाऱ्यांच्या प्रवाहावर परिणाम होतो. यामुळे अनियमित स्वरूपात पाऊस होतो. कधी मुसळधार तर कधी कोरडं वातावरण निर्माण होतं. यापूर्वीही एल निनोचा भारतात असाच प्रभाव दिसून आला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळसदृष्य स्थिती निर्माण झाली. जुलै महिन्याच्या अखेरीस मान्सूनला आणखी एका हवामान प्रणालीमुळे चालना मिळणार आहे. त्यामुळे पुन्हा अतिवृष्टीचा इशारा देण्यात येईल. पण हवामान शास्त्रज्ञांनी तरीही सावधगिरी बाळगायचा सल्ला दिला आहे. यंदाचा मान्सूनचा हंगाम अत्यंत अस्थिर असेल असा त्यांचा अंदाज आहे.

## शेतकरी कर्जमाफी योजनेत आणखी २३ लाख शेतकरी पात्र

तभा वृत्तसेवा



मुंबई : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने कर्जमाफी योजना आणली आहे. या कर्जमाफीचा राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे कर्जमाफीच्या या योजनेतील एक निकष बदलण्यात आले आहे. या नव्या बदलामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार आहे. या कर्जमाफी योजनेसह नियमित कर्जाची रक्कम भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पैसे देखील मिळणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर याबाबत अतिशय महत्त्वाची माहिती दिली.

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ च्या निकषात सुधारणा करण्यात आली आहे. २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफी करण्यात आली आहे. सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. मी विधानसभेत घोषणा केली होती, आजपर्यंत सर्व कर्जमाफी योजनांमध्ये नगदच्या कर्जमाफी योजनेतील जे पात्र उमेदवार असतात त्यांना अपात्र करण्यात आलं. यावेळी आम्ही त्यांनाही ५० हजारांपर्यंत पात्र करण्याचा निर्णय घेतला होता. पण रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वात सत्तापक्षाचे आमदार मला भेटले आणि त्यांनी विनंती केली की, त्यांनाही २ लाखांची कर्जमाफी द्यावी. म्हणून पहिल्यांदाच राज्याच्या इतिहासात कर्जमाफीमध्ये त्यांचाही समावेश करण्यात आलेला आहे, अशी महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दुसरी जी अट होती २०२६-२७ सालाचे पैसे भरले तर प्रोत्साहनपर पैसे मिळतील. ही २०२६-२७ ची अट आपण काढून टाकलेली आहे. २०२५-२६ सालाचे पैसे ज्यांनी भरले असतील त्यांना प्रोत्साहनपर मदत मिळणार आहे. यामुळे काही शेतकरी अपात्र झाले असते. पण ते पात्र झालेले आहेत. मला असं वाटतं की आता देशातील आणि राज्यातील सगळ्यात मोठी कर्जमाफी ५६ लाख शेतकऱ्यांकरता जाहीर केली आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# नाशिकमध्ये २८ रस्त्यांना मंजुरी !

तभा वृत्तसेवा



नाशिक : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्र्वभूमीवर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाने २८ रस्त्यांना मंजुरी देतानाच तपोवनातील महत्त्वाच्या जनार्दन स्वामी मठ-लक्ष्मी नारायण मंदिर पूल ते ड्रीम सिटी चौक रस्त्याला अखेर सुधारित मान्यता दिली आहे. त्यामुळे या दोन्ही महामार्गांची 'कनेक्टिव्हिटी' वाढणार आहे.

या रस्त्यांच्या रुंदीकरणासह डांबरीकरणासाठी प्राधिकरणाने अवघा १५ कोटींचा निधी मंजूर केला होता. परंतु, १५ कोटींत या रस्त्याचे काम होऊ शकत नसल्याने महापालिकेच्या बांधकाम विभागाने प्राधिकरणाकडे फेरप्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर प्राधिकरणाने या रस्त्यासाठी ३० कोटींचा निधी मंजूर केल्याने सिंहस्थापूर्वी रस्त्याच्या डांबरीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

नाशिकमध्ये सिंहस्थाच्या पार्श्र्वभूमीवर भाविक, साधू-महंतांच्या सुविधेसाठी विविध कामे करण्यासाठी पालिकेने १५ हजार कोटींचा आराखडा सादर केला होता. त्यात जनार्दन स्वामी मठ, लक्ष्मीनारायण पूल ते ड्रीम सिटी दोन किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी १५ कोटींचा निधी मंजूर केला होता. परंतु, या निधीतून रस्ता रुंदीकरणासह डांबरीकरण शक्य नसल्याचा दावा महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी प्राधिकरणाकडे केला होता. तपोवनाला जोडणारा जनार्दन स्वामी मठ ते ड्रीम सिटी चौक हा रस्ता सिंहस्थासाठी महत्त्वाचा असल्याने त्याच्या कामासाठी ३० कोटींचा निधी मिळावा अशी मागणी महापालिकेने केली होती. अखेर प्राधिकरणाने महापालिकेच्या मागणीला मंजुरी दिली असून, या रस्त्यासाठी ३० कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यानुसार महापालिकेने निविदा प्रक्रिया सुरू केली.

'शहरांना विकासाचे केंद्र मानून त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी 'अर्बन चॅलेंज फंड'च्या माध्यमातून विकास करण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केली. शहरांच्या सर्जनशील विकासासाठी या अभिनव अभियानामुळे नागरी पायाभूत सुविधा आणि सेवा वितरणात लक्षणीय सुधारणा होईल', असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत अर्बन चॅलेंज फंड अभियानाच्या आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करताना महाराष्ट्राने या दृष्टीने पावले टाकली असून, यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेत या धर्तीवर निधी उभारणी करून पाणीपुरवठा आणि स्वच्छतेला बळ देण्यात आले आहे. या महानगरपालिकांच्या निधी उभारणीसाठी राष्ट्रीय सर्वोच्च समितीची मंजुरी मिळाली आहे. तसेच पिंपरी-चिंचवड आणि नागपूर महापालिका येथील काही प्रकल्पांना या पद्धतीने निधी उपलब्ध होणार आहे', असे त्यांनी यावेळी सांगितले.

# जूनमध्ये महागाईचा महा-विस्फोट !

वृत्तसंस्था



नवी दिल्ली : महागाईबद्दल चिंता आता दिवसेंदिवस वाढली आहे, ज्याचा पुरावा पुन्हा एकदा आकडेवारीच्या रूपात पाहायला मिळत आहे. जून २०२६ मध्ये घाऊक महागाई म्हणजे थझख निर्देशांक मे महिन्यातील ९.६८ च्या तुलनेत गेल्या महिन्यात ९.८७ टक्क्यांवर पोहोचला. अशाप्रकारे, ही महागाई दरवाढ बाजाराच्या अपेक्षेपेक्षा जास्त राहिली. तज्ज्ञांना जूनमध्ये घाऊक महागाई सुमारे ९.३८% राहणे अपेक्षित होते, पण प्रत्यक्ष आकडा यापेक्षा जास्त आला. उझखखढ म्हणजे सरकारी उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या प्रसिद्ध आकडेवारीनुसार, या दरवाढीचे सर्वात मोठे कारण अन्नधान्य महागाई आणि प्राथमिक वस्तू, म्हणजेच कच्ची कृषी उत्पादन आणि इतर प्राथमिक वस्तूंच्या किमतीतील वाढ असल्याचे मानले जाते. इंधन आणि वीज, उत्पादित वस्तू व खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्यामुळे महागाईने उंच उडी घेतली. मध्यपूर्वेतील तणाव नव्याने वाढला ज्यामुळे दैनंदिन गरजेच्या वस्तू आणि खाद्यपदार्थांच्या वाढत्या किमतींमुळे महागाईने कळस गाठला. फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झालेल्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव निवळण्याचं नाव घेत नाही परिणामी, महागाईचा भडका उडण्याची शक्यता आहे. याआधी आदल्या दिवशी किरकोळ महागाईचा दर जाहीर केला गेला जो सलग सातव्या महिन्यात ४.३८ टक्क्यांवर पोहोचला. इंधन महागाईत घट झाली असली तरीही, वाढत्या अन्नधान्याच्या किमती आणि उत्पादन खर्चाच्या दबावामुळे महागाईचा भडका उडाला. थझख वर आधारित महागाई सलग दुसऱ्या महिन्यात दुहेरी अंकांजवळ राहिली. अन्नधान्याच्या किमती, पेट्रोलियम उत्पादने, मूलभूत धातू आणि रसायने यांच्या किमतीतील वाढ या महागाई वाढीचे मुख्य घटक ठरले. पश्चिम आशियाई संकट आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील प्रभावी नाकेबंदीमुळे घाऊक महागाईतील ही तीव्र वाढ झाली. अशा स्थितीत, अमेरिका-इराणने होर्मुझची वाट रोखून धरली असून होर्मुझ सामुद्रधुनीतून भारत आपल्या कच्च्या तेलाचा बहुतांश भाग आयात करतो, ज्याचा परिणाम अन्न-धान्याच्या किमतींवरही झाला. दररोजच्या वापराच्या (प्राथमिक वस्तू) वस्तूंची महागाई ४.९९% वरून ७.00% पर्यंत वाढली. अन्नधान्याची महागाई ४.४९ टक्क्यावरून वरून ६.१४ टक्के पर्यंत वाढली. इंधन आणि विजेची घाऊक महागाई ३०.३३ टक्क्यावरून २७.४१ टक्के पर्यंत कमी झाली. उत्पादित वस्तूंची घाऊक महागाई ७.४८ टक्क्यावर स्थिर राहिली. दीर्घकाळ टिकणाऱ्या उच्च घाऊक चलनवाढीचा बहुतेक उत्पादक क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे थझख महागाई दर दीर्घकाळ उच्च राहिल्या, तर उत्पादक त्याचा भार ग्राहकांवर टाकतील परिणामी, दररोजच्या वस्तूंसाठी जास्त किंमत मोजावी लागेल. सरकार केवळ टॅक्सच्या माध्यमातून घाऊक किंमत निर्देशांक नियंत्रित करू शकते. उदाहरणार्थ, क्रूडच्या तीव्र दर वाढीच्या पार्श्र्वभूमीवर सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्क कमी केले, पण सरकार केवळ एका मर्यादेपर्यंतच कर कपात करू शकते. मेटल, रसायने, प्लॅस्टिक आणि रबर यांसारख्या कारखान्याशी संबंधित वस्तूंना थझख मध्ये अधिक महत्त्व असते.

## राज्यात भाजीपाल्याचे दर झाले दुप्पट !

तभा वृत्तसेवा

मुंबई: राज्यात मागील काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले असून बाजारात आवक घटल्याने भाजीपाल्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. पावसानंतर मागणी वाढल्याने अनेक भाज्यांचे भाव दुप्पट झाले असून सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.जून महिन्यात पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने भाजीपाला पिकवला होता. मात्र जुलैच्या सुरुवातीला झालेल्या जोरदार पावसामुळे शेतात पाणी साचून अनेक पिकांचे नुकसान झाले. परिणामी बाजारात पुरवठा कमी झाला आणि दर वाढले आहेत.वाढले आहेत.

# नवऱ्यानं बायकोला प्रियकरासोबत पकडलं

वृत्तसंस्था



लखनऊ : पती त्याच्या पत्नीला तिच्या प्रियकरासोबत हॉटेलच्या खोलीत रंगेहात पकडलं आणि जोरदार राडा झाला. हॉटेलच्या परिसरात मोठा गदारोळ उडाला. पतीनं हॉटेलात जाऊन व्हिडीओ केला आणि मग तो सोशल मीडियावर व्हायरल झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले आणि तिघांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेलं. यानंतर बरेच तास वाद चालला. उत्तर प्रदेशच्या न्यू आग्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा सगळा प्रकार घडला. घटनेनंतर हॉटेलच्या बाहेर तोबा गर्दी जमली. संपूर्ण परिसरात याच घटनेची चर्चा होती. कमला नगरमध्ये राहणाऱ्या व्यावसायिकाला त्याच्या पत्नीवर संशय होता. त्यामुळे त्यानं पत्नीवर बारीक नजर ठेवली. पत्नी अन्य व्यक्तीच्या संपर्कात असल्याची शंका व्यावसायिकाला होती. दुपारी तीनच्या सुमारास व्यावसायिकाची पत्नी लेकीला घेऊन घराबाहेर पडली. कामाच्या बहाण्यानं ती घरातून निघाली. यानंतर पतीनं तिचा पाठलाग सुरू केला व्यावसायिकाची पत्नी न्यू आग्रा परिसरातील एका हॉटेलात पोहोचली. तिथे तिचा प्रियकर आधीपासूनच उपस्थित होता. पत्नीच्या पाठोपाठ पतीनंही हॉटेल गाठलं. तिथं त्यानं पत्नीला प्रियकरासोबत पाहिलं. पतीनं विरोध दर्शवला आणि व्हिडीओ रेकॉर्डिंग सुरू केलं. बघता बघता पती, पत्नी आणि प्रियकर यांच्यात वाद सुरू झाला. हॉटेलमध्ये बराच वेळ गोंधळ सुरू होता. आरडाओरडा ऐकून हॉटेलचे कर्मचारी पोहाचले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. 'लेकीला मैत्रिणीकडे सोडून ही इकडे आलीय,' असं पती वारंवार म्हणत होता. त्याचे हे शब्द व्हिडीओत कैद झाले आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा; महात्मा फुले कर्जमाफी लाभार्थ्यांनाही आता ₹2 लाखांपर्यंत कर्जमाफी

## शेतकऱ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी विशेष मोहीम- आमदार प्रशांत बंब



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१४:** राज्यातील शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ मधील अनेक अटी शिथिल व रद्द करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही आता कमाल ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ५६ लाखांहून अधिक शेतकरी लाभार्थी ठरण्याची अपेक्षा आहे.

या निर्णयाची माहिती देण्यासाठी गंगापूर तहसील कार्यालयात आमदार प्रशांत बंब यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत कर्जमाफीतील अनेक अडथळे दूर केले आहेत. यापूर्वी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ₹५० हजारांपर्यंतच लाभ मिळत होता. तसेच थकीत कर्जाची रक्कम ₹५० हजारांपेक्षा जास्त असल्यास उर्वरित रक्कम स्वतः भरल्यानंतरच लाभ मिळत होता. आता ही अट पूर्णपणे रद्द करण्यात आली असून, अशा शेतकऱ्यांनाही थेट ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे.

आमदार बंब यांनी सांगितले की, १ एप्रिल २०१९ ते ३ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीककर्ज, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेले असल्यास संबंधित शेतकरी या योजनेस पात्र ठरणार आहेत. तसेच पुनर्गठित (Restructured) पीककर्जांनाही योजनेचा लाभ लागू राहणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही शासनाने मोठा दिलासा दिला आहे. सन २०२२-२३,२०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षांमध्ये पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या नियमित कर्जदारांना ₹५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. यापूर्वी या लाभासाठी २०२५-२६ आणि २०२६-२७ या दोन्ही वर्षांतील नियमित कर्जफेड बंधनकारक होती. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ मधील नियमित कर्जफेडीची अट रद्द केल्याने अधिकाधिक शेतकरी या योजनेस पात्र ठरणार आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण (e-KYC), Agristack नोंदणी आणि Farmer ID आवश्यक असल्याची माहितीही आमदार बंब यांनी दिली. शासनाकडून अर्ज प्रक्रिया सुरू झाल्यानंतर प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचावा यासाठी आमदार प्रशांत बंब मित्रमंडळ, कार्यमित्र, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी गावागावांत विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी ही आतापर्यंतच्या महत्त्वाच्या कर्जमाफींपैकी एक असल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन अनेक अटी शिथिल केल्यामुळे अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा विश्वास आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केला.

## बिडकीन बस स्थानक परिसरात वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा

**बिडकीन | दि. १४ जुलै :** एसटी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे राज्यभर वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशानुसार राज्यातील बसस्थानके, आगारे व विभागीय कार्यालय परिसरातील सुमारे एक हजार ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याच उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर–पैठण रोडवरील बिडकीन बस स्थानक परिसरात मंगळवार, दि. १४ जुलै रोजी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच अशोक धर्मे व काकासाहेब टेके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजेंद्र वैद्य, तमिजोद्दीन इनामदार, ग्रामपंचायत सदस्य मधुकर सोकटकर, सुनील धूत, दिलीप चव्हाण, पत्रकार नंदकुमार वैद्य, तरुण भारतचे पत्रकार अरुण देविदास, विशाल चव्हाण, आकाश वंजारे, संदीप गायकवाड तसेच वाहतूक नियंत्रक अशोक औटे यांची प्रमुख उपस्थिती होती. बिडकीन बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक अशोक औटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथही घेतली.

## आईकु झेड11 लाइट 24 जुलै रोजी लॉन्च होणार

**नवी दिल्ली :** उच्च-कार्यक्षमतेचा स्मार्टफोन ब्रँड आईकु २४ जुलै रोजी आपला नवीन आईकु झेड११ लाइट लॉन्च करत आहे. हा स्मार्टफोन विशेषतः अशा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केला आहे, जे ऑनलाइन लेक्चर्सना उपस्थित राहतात, असाइनमेंट्स आणि नोट्स तयार करण्यासाठी एआयचा वापर करतात, दररोज मल्टीटास्किंग करतात आणि ज्यांना घराबाहेरच्या वापरासाठी चमकदार डिस्प्ले असलेला एक मजबूत आणि टिकाऊ स्मार्टफोन हवा आहे. आईकु झेड११ लाइट हा एआय-सक्षम उत्पादकता वैशिष्ट्ये आणि स्टायलिश डिझाइन यांचे एक उत्तम संयोजन आहे. हा नवीनतम ओरिजिन ओएस ६ वर आधारित आहे आणि त्याला ४ वर्षांचे सुरक्षा अपडेट्स मिळतील. हा स्मार्टफोन "नॉन-स्टॉप. नो लिमिट." आहे. "शिकण्याची संकल्पना" या भावनेने डिझाइन केलेला, आईकु झेड११ लाइट हा वापरकर्त्यांना अखंड शिक्षण, काम आणि मनोरंजनाचा अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

## आयुष्यभर आर्थिक स्वातंत्र्याकडे वाढता कल

छत्रपती संभाजीनगर - भारताच्या लोकसंख्येत वेगाने बदल होत आहेत. आज भारत तरुण देश म्हणून ओळखले जात असला, तरी देशात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वेगाने वाढत आहे. राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाच्या अंदाजानुसार, 2036 पर्यंत भारतातील प्रत्येक सातपैकी एक व्यक्ती ज्येष्ठ नागरिक असेल आणि त्यांची संख्या वाढून सुमारे 23 कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे.ही गरज लक्षात घेऊन आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु गोल्ड पेन्शन सेव्हिंग्ज ही बोनस-लिंक्ड पेन्शन योजना सुरू केली आहे. ही योजना सुरक्षितता आणि लवचिकता लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे. या योजनेद्वारे ग्राहक निवृत्तीसाठी चांगला पेन्शन निधी तयार करू शकतात. यामध्ये गुंतवलेली रक्कम सुरक्षित राहते. तसेच आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगी किंवा आजारपणाच्या वेळी अंशतः रक्कम काढण्याची सुविधाही मिळते. त्यामुळे कुटुंबाचे आर्थिक भविष्य अधिक सुरक्षित राहण्यास मदत होते.

## पंढरपूर वारीतील सहभागातून जेमिनीने महाराष्ट्रासोबतचे आपले नाते अधिक दृढ केले

**अहमदनगर :** पंढरपूर वारीत सहभाग घेत जेमिनीने महाराष्ट्रातील स्थानिक समुदायांशी आपले नाते अधिक दृढ केले आहे आणि राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सन्मान केला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, पुण्याहून चार 'जेमिनी सेवा व्हॅन'ला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या व्हॅनमध्ये वारकऱ्यांसाठी मोबाईल चार्जिंगची सुविधा देण्यात आली असून, त्या पुण्यापासून पंढरपूरपर्यंत वारकऱ्यांसोबत प्रवास करतील. यामुळे भाविकांना त्यांच्या संपूर्ण यात्रेत आपल्या कुटुंबाशी संपर्कात राहणे सोयीचे होईल.या यात्रेदरम्यान वारकऱ्यांना फराळ वाटप करणाऱ्या रेस्टॉरंट भागीदारांना कंपनीतर्फे 'जेमिनी शेंगदाणा तेल' (Gemini Groundnut Oil) पुरवले जाईल. याशिवाय, पावसाळ्यात मौल्यवान वस्तू सुरक्षित आणि कोरड्या ठेवण्यासाठी एक लाख पारदर्शक (ट्रान्सपरंट) युटिलिटी पाऊच, तसेच खिशात ठेवण्याजोगी 'पॉकेट आरती' आणि खास की-चेनचे वाटप केले जाईल, जे भाविकांसाठी यात्रेची एक उपयुक्त आठवण ठरेल.

## गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवून न्याय द्या; विटा येथील भूमिहीनांचे उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरु



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१४ जुलै - मौजे विटा (ता. कन्नड) येथील गट क्रमांक ३५, सर्वे क्रमांक १५ या शासकीय गायरान जमिनीवरील कथित बेकायदेशीर अतिक्रमण हटवून भूमिहीन दलित कुटुंबांना न्याय मिळावा, या मागणीसाठी भगवान ठोकळ व अर्जुन खरात यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण मंगळवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिले. प्रशासनाकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याने उपोषणकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

उपोषणकर्त्यांच्या निवेदनानुसार, संबंधित गायरान जमिनीवर अनेक वर्षांपासून प्रभावशाली व्यक्तींनी बेकायदेशीर अतिक्रमण करून बंगले, गोठे, कांद्याच्या चाळी, विहिरी, पाइपलाइन तसेच अन्य कायमस्वरूपी बांधकामे उभारली आहेत. त्यामुळे शासनाच्या मालकीच्या जमिनीचा खासगी वापर होत असून भूमिहीन व मागासवर्गीय कुटुंबांवर अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, भूमिहीन दलित कुटुंबांना शेती करण्यासाठी व उपजीविकेसाठी आवश्यक असलेल्या जागेवर अडथळे निर्माण केले जात असून काही व्यक्तींकडून मानसिक दबाव व त्रास दिला जात असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे गावात सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही उपोषणकर्त्यांनी म्हटले आहे.

उपोषणकर्त्यांनी महसूल विभागामार्फत संबंधित गायरान जमिनीची तातडीने संयुक्त मोजणी करून सर्व अतिक्रमणे निष्कासित करावीत, संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, तसेच भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. याशिवाय दलित कुटुंबांना कोणत्याही प्रकारचा त्रास, धमकी किंवा दबाव होणार नाही, यासाठी प्रशासनाने संरक्षण द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

## स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांची जयंती साजरी



**पैठण दि १४ :-** मुख्यमंत्री तथा केंद्रीय गृहमंत्री तथा पैठणचे भूमिपुत्र स्व. शंकरराव चव्हाण यांची जयंती आज शिवाजी नागरी बँकेच्या मुख्य कार्यालय पैठण व संत ज्ञानेश्वर उद्यान येथील त्यांच्या पूर्णकृती पुतळ्या समोर साजरी करण्यात आली. याप्रसंगी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे व्हा. चेअरमन भाऊसाहेब पा. औटे, संचालक राजू भाऊ टेकाळे, गणेश शेळके, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई आय पठाण, शाखाधिकारी संतोष राऊत, कृष्णा काकडे, ईश्वर ढोकळे, राजू निवारे, अन्सार सय्यद, मेघा श्रीवास्तव, सुभद्रा सोंडगे, अमर तावरे, प्रकाश सोनवणे, पवन काळे, भाऊसाहेब कणसे, आबेद पठाण, फौजदार जाधव आदी उपस्थित होते.

## साईनगरमध्ये 'झन्ना-मन्ना' जुगार अड्ड्यावर गंगापूर पोलिसांची धाड; 14 जणांविरुद्ध गुन्हा, ₹12,020 मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

**गंगापूर १४:** गंगापूर शहरातील साईनगर परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर 'झन्ना-मन्ना' जुगार अड्ड्यावर गंगापूर पोलिसांनी मंगळवारी (दि. १४) मध्यरात्री धाड टाकून १४ जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख ₹१२,०२० मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत – शहजाद कादर बागवान (३२), अशफाक नवाब शहा (३२), मोईन शेरू शहा (२७), सलीम उस्मान बागवान (३०), शेखर सुभाष लगड (३४), सचिन संजय सोनवणे (२२), किरण गणेश बत्तीसे (२६), तौफीक चांद शेख (२२), गणेश विजय बेडवाल (२६), अरबाजखान मन्नानखान पठाण तडवी (२३), ईस्माईल मेहबूब शहा (२३), धरमसिंग हरिचंद राजपूत (४२), शहानूर सत्तार बागवान (३०) आणि संतोष लक्ष्मण जाधव (४०).

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ जुलै रोजी रात्री १२.०७ वाजण्याच्या सुमारास साईनगर येथील सनी कचके यांच्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये काही जण पैसे लावून 'झन्ना-मन्ना' जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. यावेळी सर्व आरोपी जुगार खेळताना आढळून आले.

कारवाईदरम्यान आरोपींकडून अंगझडतीत मिळालेली रोख रक्कम व डावावर लावलेले पैसे असा एकूण ₹१२,०२० मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अंमलदार रमेश जारवाल यांच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६७/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अंमलदार सिंगल करीत आहेत.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे 'महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोल' पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव, दि.१४ जुलै :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील प्राध्यापक डॉ. पंकज शिंदे लिखित 'महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोल' या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार दि.१४ जुलै २०२६ अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश काळे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. हे डॉ.शिंदे यांचे सातवे पुस्तक असून शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण भर ठरणार आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,प्रो.डॉ.शिवाजी अंभोरे,डॉ.सी.यू.भोरे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ.पंकज शिंदे यांचे अभिनंदन करत त्यांच्या सातत्यपूर्ण लेखनकार्याचे कौतुक केले.विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, अभ्यासक्रमाभिमुख व संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक निश्चितच मार्गदर्शक ठरेल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ.शिंदे यांना पुढील लेखन व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.पुस्तक प्रकाशनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेलान आहे.

## मातोश्री अनाथ आश्रमातील आई बाबाचे सानिध्यात विधायक वृत्तपत्राचे संपादक ज्ञानेश्वर बोरसे यांचा उपक्रम



**सिल्लोड (प्रतिनिधी) :** वाढदिवसाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर पैठण रोडवरील मातोश्री अनाथ आश्रम येथील आई बाबांची भेट घेत, या आई बाबांच्या जीवनामध्ये आपलेसे कोणीतरी आहे याची जाणीव व्हावी म्हणून विधायक वृत्तपत्राचे संपादक ज्ञानेश्वर दगडू बोरसे यांनी आपला वाढदिवसाचा संपूर्ण प्रसंग त्यांच्या सोबत घालत आपापलेपणाचे आणि जिव्हाळ्याचे एक आनोखे असे नाते जपण्याचा प्रयत्न दि.१३-७ रोजी करण्यात आला.

वाढदिवस साजरा करण्याऐवजी वाढदिवस साजरा करताना होणारा नाहक खर्च हा मातोश्री वृद्धाश्रमातील आई-बाबांसाठी कसा खर्च होईल याचा विचार करून या आई-बाबांसाठी केळी पपई सारखे फळ खर्च करून ते या आई-बाबांना वाटप करण्यात आले. मातोश्री वृद्धाश्रमात आई-बाबांची भेट घेऊन फळ वाटप करत असताना ज्ञानेश्वर बोरसे यांचे कुटुंब व त्याचप्रमाणे दैनिक तरुण भारत सिल्लोड तालुक्याची प्रतिनिधी गजानन मरकड हे उपस्थित होते.

मातोश्री वृद्धाश्रमातील आई-बाबांची चर्चा करत असताना काही आई-बाबांनी आपल्या जीवनातील सुखदुःखातील प्रसंग सांगितले व भेट घेतलेल्या बोरसे कुटुंबियांना दीर्घायुष्य लाभो असे उद्गार काढत आम्हाला पुन्हा भेटण्यासाठी या असे शेवटी सांगितले.

### जाहिर प्रगटन

**मा. आर.एन. ढोके साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२३५/२०२६.
पुढील तारीख ०३/०८/२०२६.

अर्जदार : - १. जायदाबी इब्राहिम शेख, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. करीम नगर, कनड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. शाहेदा बेगम फेरोज खान, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. छम्मन का बंगला, कलड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. नाहेदा बेगम इरफान शेख, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. इस्लामपूर, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव. ४. फारूक इब्राहिम शेख, वय ३७ वर्षे, धंदा मजुरी, रा. करीम नगर, कनड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५. खालीदा मो शकील शेख, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नया नगर मिरा रोड, मिरा भाईदर, ता. ठाणे, जि. ठाणे. ६. उजमा जफर शेख, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. कसाबखेडा. ता. कत्रड, जि. औरंगाबाद. ७. इमरान इब्राहिम शेख, वय ३४ वर्षे, धंदा मजुरी, रा. करीम नगर, कत्रड, ता. कलड, जि. औरंगाबाद. ८. इरफान इब्राहिम शेख, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी, रा. करीम नगर, कन्नड, ता. कतन्नड, जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :-निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ऑक्ट १८२७ कलम२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २, ३, ५, ६ ह्या मुलीअसून अर्जदार क्र. ४, ७ व ८ हे मुले आहेत. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. १ ते ८ यांचे वडील मयत इब्राहिम निजाम शेख हे दि. १७/०८/२०२५ रोजी मौजे कन्नड येथे मरण पावले आहेत. सोबत मयत इब्राहिम निजम शेख यांचे नगर पालिका ककत्रड यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र सोबत दाखल करीत आहे. मयत इब्राहिम निजम शेख यांना अर्जदार क्र. १ ते ८ शिवाय इतर दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार क्र. १ ते ८ यांना मयत इब्राहिम निजम शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, भूमि अभिलेख कार्यालय. गाव नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालयात आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे मयताचे वारस असल्याचे निश्चित होऊन तत्संबंधीचे वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्यामुळे अर्जास कारण घडजे आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायलयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांना मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे बाबत आदेश पारीत करण्यात येईल. दि.१३/०७/२०२६.

आदेशावरून

लिपिक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर. कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, क-स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दि. किरकोळ अर्ज क्रं. २४६/२०२६

अर्जदार :- सचिन पि. भिकन कांबळे, वय ३८ वर्ष, धंदा मजुरी, रा. साठे नगर, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ अन्वये अर्जदार हा मयत पुंजाबा रखाजी कांबळे यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळणे बावत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. सचिन एस. बोरसे यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हा वरील प्रमाणे रहिवाशी आहे. अर्जदारचे आजोबा नामे रुंजाजी रखाजी कांबळे यांचे सख्खे भाउ व अर्जदाराचे चुलत आजोबा नामे पुंजाबा रखाजी कांबळे यांचा दिनांक १२/०३/१९८४ रोजी आजारपणात मृत्यू झालेला आहे. अर्जदारचे आजोबा नामे रुंजाजी रखाजी कांबळे व मयत पुंजाबा रखाजी कांबळे हे दोघे सख्खे भाउ होते. पुंजाबा रखाजी कांबळे हे दिनांक १२/०३/१९८४ रोजी मयत झालेले असुन त्यांची पत्नी झिंगाबाई पुंजाजी कांबळे ह्या देखील त्यांच्या पश्चात मयत झालेल्या आहेत. तसेच मयत पुंजाजी रखाजी कांबळे यांना एक अविवाहीत मुलगा नामे एकनाथ पुंजाजी कांबळे हा होता, तो देखील दिनांक ११/०१/२०२५ रोजी मयत झालेला आहे. मयत पुंजाबा रखाजी कांबळे यांचा सख्खा भाउ व अर्जदाराचा सख्खा आजोबा रूंजाजी रखाजी कांबळे हे देखील दिनांक १६/०५/१९८६ रोजी मयत झालेले असुन त्यांची पत्नी नामे सोनाबाई रूंजाजी कांबळे ह्या देखील त्यांच्या पश्चात मयत झालेल्या आहेत. तसेच मयत रुंजाजी रखाजी कांबळे यांना एक मुलगा नामे भिकन रूंजाजी कांबळे हा होता तो देखील मयत झालेला असुन मयत भिकन रुंजाजी कांबळे यांना एक पत्नी नामे भिमाबाई भिकन कांबळे व एक मुलगा नामे सचिन भिकन कांबळे अर्जदार हे हयात आहेत. अर्जदार हा मयत पुंजाबा रखाजी कांबळे यांचा वर्ग २ चा कायदेशीर वारस हयात असुन अर्जदाराशिवाय मयत पुंजावा रखाजी कांबळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस हयात नाहीत. मयत पुंजावा रखाजी कांबळे यांचा अर्जदार हा वर्ग २ चा कायदेशीर वारस असल्याने त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस

प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदाराने सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हा मयत पुंजाबा रखाजी कांबळे यांचा वर्ग २ चा कायदेशीर वारस असल्या बाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत आपला आक्षेप उजर सादर करावा. मुदतीत उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अर्जदार हा मयत पुंजाबा रखाजी कांबळे यांचा वर्ग २ चा कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणप प्रदान करण्यात येईल.

दिनांक :-१३/०७/२०२६

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. १४३/२०२६

अर्जदारः- १. अंजनाबाई कडूबा शेळेकर, वय ६७ वर्षे धंदा घरकाम, रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. कैलास कडूबा शेळेकर, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. गजानन कडूबा शेळेकर, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ४. आशाबाई संजय उबाळे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. लेणापुर पहुर (कसबे), ता. जामनेर, जि. जळगांव. ५. उषाबाई जितेंद्र उबाळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. भोजे, ता. पाचोरा, जि. जळगांव. ६. सुरेश कडूबा शेळेकर, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदारः - निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत कडूबा गोविंदा शेळेकर हे दि. ०७/१२/२०२५ रोजी रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ६ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ६ हे मयत कडूबा गोविंदा शेळेकर यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख - 17/8/26

आज दि. १४/०७/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात जि.छ. संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १२५/२०२६.
नि.क्रं.

1. विलास भिमराव सोनवणे, रा. गलवाडा, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर 2. संगीता राजेंद्र शेवाळ रा.भडगाव, ता.भडगाव, जि. जळगाव ३. किशोर भिमराव सोनवणे (मयत) १) पुष्पा किशोर सोनवणे, रा.. गलवाडा, ता.सोयगाव, जि.छ.संभाजीनगर 4. उज्वला राजेश जाधव, रा.भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव 5. राहुल भिमराव सोनवणे, रा. गलवाडा, ता.सोयगाव, जि.छ. संभाजीनगर

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगाव, ता. सोयगाव, जि.छ.संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भिमराव शंकर सोनवणे यांचा दिनांक ०३/१२/२०२५ रोजी छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत भिमराव शंकर सोनवणे यांचे वारस असुन त्यांचा शासकीय / निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराचा वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी दिनांक. ०२/०७/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ३०/०७/२०२६.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात जि.छ. संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११७/२०२६.
नि.क्रं.

1. देवकाबाई शिवाजी रोकडे, रा. आमखेडा, तालुका सोयगाव, जिल्हा छ. संभाजीनगर. 2. मीना अशोक वाघले, रा. मनमाड, ता. मनमाड, जिल्हा नाशिक. ३. रेखा शिवाजी जाधव, रा. तिरुपती पार्क, गुरुसाहणी नगर, छ. संभाजीनगर, ता व जि. छ. संभाजीनगर. ४. नीता अशोक जाधव, रा. रेल्वे स्टेशन रोड, धुळे, तालुका व जिल्हा धुळे.

विरुद्ध

१. प्रदीप शिवाजी रोकडे, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा. छ. संभाजीनगर.

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगाव, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत शिवाजी सोनू रोकडे यांचा दिनांक ३०/०८/२०२५ रोजी आमखेडा येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे मयत शिवाजी सोनू रोकडे यांचे वारस असुन त्यांचा शासकीय / निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराचा वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी दिनांक. ०२/०७/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १७/०७/२०२६.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

### जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात जि.छ. संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १२३ /२०२६,
नि.क्रं.

1. प्रतिभा संजय महाजन रा. मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक 2. आशाबाई रविंद्र माळी रा.अंबड, ता.नाशिक, जि.नाशिक ३. मनीषा अरुण जाधव रा. नगरदेवळा, ता. पाचोरा, जि.. जळगाव ४. वैशाली पंकज माळी रा. अजंग, ता. धुळे, जि. धुळे

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगाव, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत मीराबाई नारायण चौधरी (लग्नानंतर चे नाव मीराबाई धोंडू बिराडी) यांचा दिनांक ०१/०६/२०२६ रोजी निंभोरा येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत मीराबाई नारायण चौधरी (लग्नानंतर चे नाव मीराबाई धोंडू बिराडी) यांचे वारस असुन त्यांचा शासकीय / निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराचा वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी दिनांक. ०२/०७/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ३०/०७/२०२६.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

### जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात जि.छ. संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ९४/२०२६.
नि.क्र.

1. सतीश काशिनाथ आगे, रा. सोयगाव, तालुका सोयगाव, जिल्हा छ. संभाजीनगर. 2. भागवत काशिनाथ आगे, रा. सोयगाव, तालुका सोयगाव, जिल्हा छ. संभाजीनगर. ३. शांताबाई काशिनाथ आगे, रा. सोयगाव, तालुका सोयगाव, जिल्हा छ. संभाजीनगर.

विरुद्ध

कोणीही नाही.

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगाव, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे मयत काशिनाथ साळूबा आगे यांचा दिनांक १४/०४/२०२६ रोजी सोयगाव येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे मयत काशिनाथ साळूबा आगे यांचे वारस असुन त्यांचा शासकीय / निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराचा वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी दिनांक. ०२/०७/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १५/०७/२०२६.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

**उपविभागीय अधिकारी, (महसूल) वैजापर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात**

संचिका क्र.2026/उ.वि.अ.वै. एम.ए.जी./ज.मृ.नोंद/12026.
दिनांक :- ०२/०७/२०२६

### जाहिर प्रगटन

अर्जदार: बाळू दादासाहेब काळे रा.कोळघर ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

गैर अर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय कनकुरी ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम 1969 चे कलम 13 (3) अन्वये जन्म-मृत्यु नोंदी बाबत.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी त्यांचे मुलगा नामे शिवराज बाळू काळे यांनी त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे यांचे मुलगा नामे शिवराज बाळू काळे यांचा जन्म नोंद ०४/०१/२०२५ रोजी मौजे रा.कोळघर ता. गंगापूर येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा मुलगा जन्म नोंद ०४/०१/०२५ रोजी मौजे रा. कोळघर ता. गंगापूर येथे येथे झालेला असून शालेय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी मागणी केल्या नुसार जन्म नोंद ०४/०१/२०२५ रोजी मौजे रा.कोळघर ता. गंगापूर येथे येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २३/०७/२०२६ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप न आल्यास अर्जदार यांचा जन्म नोंद ०४/०१/२०२५ रोजी मौजे रा. कोळघर ता. गंगापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करीता दिनांक ०२/०७/२०२६ रोजी सदर जाहीर प्रगटन माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी वैजापूर

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बसस्थानक परिसरात वृक्षारोपण; परिवहन मंत्र्यांच्या संकल्पनेतून उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ जुलै -**
राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून राज्यभरातील बसस्थानके व बस डेपो स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्याच्या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि.१४ जुलै) नळदुर्ग बसस्थानक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

राज्यातील सर्व बस डेपो आणि बसस्थानकांमध्ये स्वच्छता, सुशोभीकरणासह पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. त्यानुसार विभाग नियंत्रक अजय पाटील, विभागीय वाहतूक अधिकारी मधुरा जाधवर तसेच तुळजापूर आगार प्रमुख महेश रामपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग बसस्थानक परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचे उद्घाटन नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे आणि नगरपालिकेच्या बांधकाम समितीचे सभापती शशिकांत पुदाले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले.

यावेळी तुळजापूर डेपोचे लेखापाल सुधीर बामनकर, नळदुर्ग बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक महेश डुकरे, अनिल हांडे, मुकुंद वैद्य, सफाई कर्मचारी लहु देडे, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच प्रवासी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### सामाजिक कार्यकर्ते चनाप्पा साखरे यांचा भाजपमध्ये प्रवेश

**इटकळ, दि.१४ जुलै -**
तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शिवा संघटनेचे तालुका अध्यक्ष चनाप्पा साखरे यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या निवासस्थानी सोमवारी (दि.१३ जुलै) झालेल्या कार्यक्रमात त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. यावेळी केशेगावचे माजी उपसरपंच दयानंद जळकोटे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नव्या सदस्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास जि.प. बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे, सरपंच मल्लिनाथ गावडे, रामराजे पाटील, शिव हुक्किरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. साखरे यांच्या प्रवेशामुळे शहापूर गटात भाजपाला अधिक बळ मिळेल, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

### प्रा.डॉ. मनोज डोलारे यांची जिल्हा मानद वन्यजीव रक्षकपदी नियुक्ती

**धाराशिव, दि.१४ जुलै -**
श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. मनोज भारत डोलारे यांची महाराष्ट्र



शासनाच्या महसूल व वन विभागाकडून धाराशिव जिल्हा मानद वन्यजीव रक्षक म्हणून पुढील तीन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी एकूण ३६ मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत ही नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा.डॉ. डोलारे हे गेल्या १५ वर्षांपासून पर्यावरण संरक्षण, जैवविविधता आणि वन्यजीव संवर्धन क्षेत्रात कार्यरत असून पक्षी अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार म्हणून त्यांची राज्यभर ओळख आहे. ते जिल्हा पर्यावरण समितीचे सदस्य, बी.एन.एच.एस.चे जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे सक्रिय सदस्य आहेतफ त्यांच्या पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आली आहे.



### अनाळा जि.प. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी चिंतामणी

**परंडा, दि.१४ जुलै -**
परंडा तालुक्यातील अनाळा येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विनोद चिंतामणी तर उपाध्यक्षपदी जालिंदर शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शाळेत झालेल्या निवड प्रक्रियेनंतर नूतन समितीची घोषणा करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी अनुराधा गौतम क्षीरसागर, चित्रा ज्ञानेश्वर ईटकर, पल्लवी तानाजी रेवडे, मंगल सतीश विदयागर, अंजली लक्ष्मण शिंदे, महेंद्र शिंदे, लक्ष्मण पुरंदरे, शिवाजी जाधव, अनिल शिंदे आणि साजिद शेख यांची निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मुबारक पठाण यांच्या हस्ते अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी अध्यक्ष रेवन्नाथ शिंदे, माजी उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा...

# खरीप २०२५ च्या पिकविम्याचे ३३७ कोटी सात दिवसांत वितरित करण्याचे टीसीचे आदेश

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जुलै -**
धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक घडामोड



घडली असून, खरीप २०२५ पिकविमा प्रकरणात राज्य सरकारच्या निर्णयाला केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीने कायम ठेवत विमा कंपनीचे अपील फेटाळून लावले आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे ३३७ कोटींची विमा रक्कम पुढील सात दिवसांत जमा करण्याचे आदेश समितीने दिल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

आमदार पाटील यांनी सांगितले की, केंद्रीय समितीने राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या भूमिकेला दुजोरा दिला आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना लवकरच त्यांच्या हक्काची विमा रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयासाठी शेतकरी, विविध शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधी आणि कृषी विभागाने सातत्याने पाठपुरावा केला होता.



या लढ्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. खरीप २०२५ मध्ये धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन पिकासाठी एकूण ५०४ पीक कापणी प्रयोग (Crop Cutting Experiments - CCEs) करण्यात आले होते. त्यापैकी ५६ महसूल मंडळांतील ३६८ प्रयोगांवर विमा कंपनीने आक्षेप घेत राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे दाद मागितली होती.

राज्यस्तरीय समितीने हे आक्षेप फेटाळून लावल्यानंतर विमा कंपनीने केंद्रीय टीसीकडे अपील केले होते.

सुनावणीदरम्यान विमा कंपनीने केलेल्या आरोपांना पुरेसे दस्तऐवजी पुरावे सादर करण्यात अपयश आल्याचे समितीने नमूद केले.

तसेच पीक कापणी प्रयोगांमध्ये फेरफार, नियमभंग किंवा प्रक्रियात्मक गंभीर त्रुटी सिद्ध न झाल्याने कंपनीचे अपील फेटाळण्यात आल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

## कळंबमध्ये अनैतिक व्यवसायप्रकरणी प्रभात लॉजवर छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जुलै -**
कळंब शहरातील प्रभात लॉजवर पोलिसांनी छापा टाकून अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून, रोख रक्कम, मोबाईल, नोंदवही व अन्य साहित्य असा १६,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक शेख यांच्या पथकाला गुप्त माहिती मिळाल्यानंतर बनावट ग्राहकामार्फत खात्री करून सोमवारी (दि. १३ जुलै) सायंकाळी प्रभात लॉजवर छापा टाकण्यात आला. तपासात आरोपी समाधान महादेव कांबळे (रा. इंदिरानगर, कळंब), अमोल राजाभाऊ सोनटक्के (रा. हासेगाव) आणि नरेश खेमराज जोशी (रा. बसस्थानक परिसर, कळंब) हे महिलांना वाणिज्यिक लैंगिक शोषणासाठी आश्रय देत असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पावसाने वाशी तालुक्याकडे फिरवली पाठ...

# खरीपातील सोयाबीन पीक धोक्यात; शेतकरी चिंतेत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जुलै -**
यंदाच्या खरीप हंगामात पावसाने वाशी तालुक्याकडे अक्षरशः पाठ फिरवल्याने सोयाबीन पीक धोक्यात आले आहे. जुलै महिना अर्धा संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.



अपुऱ्या पावसाच्या भरोशावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली. मात्र, त्यानंतर पावसाने पूर्णपणे उघडीप दिल्याने अनेक ठिकाणी पिके करपू लागली असून उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यंदा बियाणे, खते, औषधे, मशागत आणि पेरणीसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. अनेकांनी कर्ज काढून शेती केली असून, पाऊस न झाल्यास हा सर्व खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वेळेत पाऊस न झाल्यास सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहणार आहे. सध्या तालुक्यातील अनेक शेतांमध्ये जमिनीला भेग पडू लागल्या आहेत, तर सोयाबीनची रोपे पिवळी पडून कोमेजण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून पावसाच्या प्रतीक्षेत आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

शेतकऱ्यांच्या मते, येत्या काही दिवसांत चांगला पाऊस झाला तर पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळू शकते; अन्यथा खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# विंड वर्ल्ड कंपनीविरोधातील शेतकऱ्यांचा संघर्ष निर्णायक टप्प्यावर; थकीत देयकांवरून संताप

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जुलै -**
धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात विंड वर्ल्ड पवनचक्की कंपनीविरोधातील बाधित शेतकरी आणि ग्रामस्थांचा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, थकीत देयकांवरून परिसरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक वर्षांपासून जमिनीचे भाडे, पगारी वाहनधारकांचे थकीत भाडे तसेच इतर प्रलंबित देयके अद्याप मिळालेली नाहीत. याबाबत कंपनी तसेच जिल्हा प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणताही ठोस तोडगा निघालेला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

कंपनीच्या प्रतिनिधींनी थकीत देयके १५ दिवसांत अदा करण्याचे तोंडी आश्वासन दिल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली होती. मात्र त्या आश्वासनाला जवळपास दोन महिने उलटूनही संबंधितांना प्रत्यक्ष पैसे मिळाले नसल्याने कंपनीच्या आश्वासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत कंपनीची अधिकृत भूमिका जाणून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र कोणत्याही अधिकाऱ्याने संपर्काला प्रतिसाद दिला नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कंपनीची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

यामुळे शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होणार की केवळ वेळकाढूपणा सुरू आहे, याबाबत परिसरात चर्चा रंगली असून बाधित शेतकरी लवकरात लवकर न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

# जनादेशाचा विश्वास अबाधित ठेवा; पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जुलै -**
भारतीय राज्यघटनेतील दहाव्या अनुसूचीअंतर्गत असलेल्या पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणा करून लोकशाहीतील जनादेशाचे संरक्षण करावे, अशी मागणी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन, उमरगा यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकारी, उमरगा यांच्यामार्फत भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय विधी व न्याय मंत्री, भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मतदार हा केवळ उमेदवाराला नव्हे तर त्याच्या पक्षाची विचारसरणी, जाहीरनामा आणि धोरणांवर विश्वास ठेवून मतदान करत असतो. त्यामुळे निवडणुकीनंतर पक्षांतर करून सत्तेच्या समीकरणात सहभागी होणे म्हणजे मतदारांच्या जनादेशाशी आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी प्रतारणा होय. सध्याच्या पक्षांतरबंदी कायद्यातील त्रुटींमुळे मोठ्या प्रमाणावरील पक्षांतराला अप्रत्यक्ष संरक्षण मिळत असून, त्यामुळे लोकशाही व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याची खंतही फाउंडेशनने व्यक्त केली आहे.

फाउंडेशनने निवेदनाद्वारे पक्ष बदलणाऱ्या आमदार-खासदारांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करून नव्याने जनतेचा कौल घेणे बंधनकारक करावे, पक्षांतराच्या प्रकरणांचा निर्णय स्वतंत्र न्यायाधिकरण किंवा भारत निवडणूक आयोगाकडे सोपवावा, तसेच अशा प्रकरणांचा अंतिम निकाल ३० ते ६० दिवसांच्या आत देण्याची सक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

याशिवाय पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींना किमान पाच वर्षे मंत्रीपद अथवा तत्सम राजकीय लाभाच्या पदांपासून दूर ठेवणे, दहाव्या अनुसूचीतील दोन तृतीयांश विलिनीकरण ही तरतूद रद्द करणे, भविष्यात 'राईट टू रिकॉल'चा विचार करणे तसेच जनादेशाचा अपमान करणाऱ्या आर्थिक प्रलोभनांवर आणि लोकप्रतिनिधींच्या खरेदी-विक्रीवर कठोर दंडात्मक तरतुदी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. राजू बटगिरे, कार्याध्यक्ष सत्यनारायण जाधव, उपाध्यक्ष व्यंकट उर्फ राजू भालेराव, सचिव किशोर औरादे, सहसचिव करिम शेख यांच्यासह ॲड. शीतल चव्हाण, ॲड. ख्वाजा शेख, ॲड. अर्चना जाधव, प्रदीप चौधरी, ज्योती माने, धानय्य स्वामी, प्रदीप मोरे, कविता साळी, बबीता मदने, किशोर बसगुंड, विजय चितर्ले आदी पदाधिकारी व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दिव्यांग वारकऱ्यांना बॅगचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ जुलै -**
वाशिम ते पंढरपूर अशी सुमारे ४०० किलोमीटरची पायी वारी करणाऱ्या संत सूरदास दिव्यांग पायी दिंडीतील २० दिव्यांग वारकऱ्यांना दयावान प्रतिष्ठान व सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रच्या वतीने प्रवासाच्या बॅगचे वाटप करण्यात आले.

कळंब येथे राहुल जाजू यांच्या निवासस्थानी दिंडीच्या मुक्कामादरम्यान हा उपक्रम पार पडला.

सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रचे धाराशिव जिल्हाध्यक्ष तथा दयावान प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इम्रान मुल्ला यांच्या हस्ते बॅगचे वितरण करण्यात आले. दिंडी प्रमुख सचिन तायडे यांनी मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी महादेव महाराज अडसूळ, इम्रान काझी, अभय गायकवाड, अमन शेख, समीर सय्यद, तोफिक सय्यद, अलिम दारवाले, आकाश पवार, वाजेद तांबोळी, आदिलअली सय्यद, आरेफ शेख, अमित जाधवर आदी उपस्थित होते.

# नळदुर्गमध्ये एसआयआर मतदार यादी दुरुस्ती प्रक्रियेत गोंधळ

### प्रशिक्षित बीएलओंची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ जुलै -**
नळदुर्ग शहरात सध्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतर्गत मतदार यादी दुरुस्तीचे काम सुरू असून, या प्रक्रियेदरम्यान विविध अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. मतदार यादी दुरुस्तीचे काम करणाऱ्या बूथस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) पुरेसे प्रशिक्षण मिळाले नसल्याने अनेक प्रश्न निर्माण होत असून, मतदारांमध्ये नाव वगळले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एकाच कुटुंबातील काही सदस्यांची नावे वेगवेगळ्या बीएलओंकडे असल्याने नाव शोधण्यासाठी नागरिकांची धावपळ होत आहे. तसेच २००२ च्या मतदार यादीतील कुटुंबप्रमुखाच्या नावाखाली मर्यादित सदस्यांचीच नोंद दिसत असल्याने मोठ्या कुटुंबांतील इतर सदस्यांची नावे पडताळणी करताना अडचणी येत असल्याचे सांगितले जात आहे. या समस्यांवर उपाय काय, याबाबत अनेक बीएलओंनाही स्पष्ट माहिती नसल्याचा दावा नागरिकांनी केला आहे.

मॅपिंग प्रक्रियेदरम्यान काही मतदारांची माहिती 'मिसमॅच' होत असल्याने संबंधित नावे अंतिम मतदार यादीत राहतील का, याबाबतही मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही ठिकाणी बीएलओ प्रत्यक्ष घरोघरी न जाता फॉर्म इतरांकडे देऊन भरून आणण्यास सांगत असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. प्रत्यक्ष पडताळणी करूनच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी होत आहे.

याशिवाय, नळदुर्गमधील काही महिला मतदारांचे माहेर किंवा मूळ वास्तव्य कर्नाटक राज्यात असले तरी त्यांची नावे येथील मतदार यादीत आहेत. अशा मतदारांच्या नोंदणीबाबतही संभ्रम निर्माण झाल्याने त्यांची नावे वगळली जातील की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या संदर्भातही बीएलओंना स्पष्ट मार्गदर्शन मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, नागरिकांनी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी संबंधित बीएलओंशी संपर्क साधून आपल्या नावाची, कुटुंबातील सदस्यांच्या नावांची आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी बीएलओंना अधिक प्रभावी प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# झेडपीच्या विद्यार्थिनींची ६ सुवर्ण, ६ कांस्यपदकांची कमाई; धाराशिव जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जुलै -**
नवी दिल्ली येथे दि.११ व १२ जुलै २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धा मालिका - ४ व द्वितीय राष्ट्रीय लाठी फेडरेशन चषक स्पर्धेत उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी दैदिप्यमान कामगिरी करत ६ सुवर्ण व ६ कांस्यपदके पटकावली. या शानदार यशाच्या बळावर धाराशिव जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची मानाची ट्रॉफी मिळवून देत विद्यार्थिनींनी जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

देशभरातील विविध राज्यांतील नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत १६ वर्षांखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात कु. अस्मिता भोसले, आनंदी कांबळे, सृष्टी सूर्यवंशी, गीता गायकवाड, महेश्वरी पालमपल्ले आणि शिवदर्शन शिंदे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदके पटकावली. तसेच इतर विद्यार्थिनींनी कांस्यपदके जिंकून संघाच्या यशात मोलाची भर घातली.




या अभूतपूर्व यशाबद्दल आ. प्रवीण स्वामी, जि.प. उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, सभापती आकांक्षा चौगुले, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर, शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, शाळेतील शिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


## जाहिर प्रगटन

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापूर यांचे कार्यालय

प्रकरण क्र.८७८/२०२६

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **फराहा नासिर सगरी रा. निलेगाव ता. तुळजापूर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांची स्वतः **फराहा नासिर सगरी** यांचा **जन्म दिनांक. ०१.०८.२००३** रोजी निलेगाव येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १०.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**नायब तहसिलदार (महसुल),**
**तहसिल कार्यालय, तुळजापूर**

## जाहिर प्रगटन

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापूर यांचे कार्यालय

प्रकरण क्र.८६७/२०२६

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **नासिर खाशिम सगरी रा. निलेगाव ता. तुळजापूर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांची स्वतः **नामे नासिर खाशिम सगरी** यांचा **जन्म दिनांक. १६.०९.१९७५** रोजी निलेगाव येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १०.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**नायब तहसिलदार (महसुल),**
**तहसिल कार्यालय, तुळजापूर**

## अग्रलेख

# क्षमतासिद्धीचे आव्हान दोन्हीकडे...

केंद्र किंवा राज्य सरकारांच्या कोणत्याही कल्याणकारी योजनेचे यश हे या योजनांच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. काही योजनांना चांगले यश मिळते, काहींना मिळत नाही. काही योजनांमध्ये त्रुटी दिसतात आणि कालांतराने त्या दुरुस्त केल्या जातात. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीआधी जाहीर केलेल्या व तातडीने अंमलबजावणी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दिसल्या आणि लगेच त्या दूर करण्याचे काम सुरू झाले. या योजनेच्या लाभार्थ्यांमधून तब्बल ९२ लाख नावे वगळण्यात आली, ही गोष्ट अंमलबजावणीच्या दृष्टीने आणि सरकारी तिजोरीच्या आरोग्यासाठी पोषक म्हणावी लागेल. महिलांचे सक्षमीकरण हा केंद्र आणि राज्य शासनाचा प्राधान्यक्रम आहे हे खरे आहे; पण त्यासाठी तिजोरीवर नाहक भार टाकून केवळ महिलांच्या पदरात आर्थिक मदतीचा ओघ वळविणे हा सक्षमीकरणाचा एकमेव मार्ग नाहीच, हे केंद्र सरकारच्या काही दूरदृष्टीच्या योजनांमधून स्पष्ट झाले आहे. लाडकी बहीण योजना लागू करताना राज्य सरकारचा हेतू तसाच होता. पण योजनेच्या आखणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटींमुळे या योजनेचा गैरफायदा घेत सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्यासाठी अपात्र लाभार्थ्यांची झुंबड उडाली. आर्थिक ओझ्यातून सावरण्यासाठी महिलांच्या सक्षमीकरणाऐवजी आपल्या यंत्रणेचे सक्षमीकरण करण्याची गरज स्पष्ट झाली आहे.

देशभरात महिलांच्या सक्षमीकरणाच्या असंख्य योजना राबविण्यासाठी सक्षम सरकारी यंत्रणा उभारण्यात आलेल्या आहेत. यामुळे महिलांना कायदेशीर आणि मानसिक आधार मिळू लागला. एकीकडे ज्या पात्र भगिनी आहेत, त्यांना टप्प्याटप्प्याने स्वावलंबी करताना, लाडकी बहीण योजनेतून वगळल्या गेलेल्या अपात्र महिलांना अन्य योजनांतील अन्य लाभांचे दरवाजे खुले करावे लागतील. महिलांकडे आता केवळ योजनांच्या लाभार्थी या नजरेने पाहिले जात नसून देशाच्या प्रगतीच्या वाटचालीच्या भागीदार आणि निर्णयकर्त्या म्हणून पाहिले जावे, ही केंद्र सरकारची भूमिका आहे. त्यामुळे योजनांची व्याप्ती वाढविताना त्या केवळ आधाराच्या कुबड्या राहू नयेत, तर कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या योजनांतून महिलांच्या अंगी स्वयंपूर्णता आणि स्वयंनिर्णयाची क्षमता निर्माण होईल यासाठी त्यांना कायमस्वरूपी आर्थिक क्षमता निर्माण होणारी साधने पुरविणे गरजेचे ठरेल. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, गृहोद्योग किंवा बचत गटांच्या माध्यमातून उत्पादित होणाऱ्या वस्तूंसाठी हक्काची कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा सक्षमीकरणाच्या योजनेचा गाभा असला पाहिजे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने राज्यातील महिला विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. महिला सक्षमीकरणाकरिता करण्यात आलेली तरतूद, नियोजनाची दिशा आणि अंमलबजावणीची वस्तुस्थिती पाहता आर्थिक, सुरक्षा, आरोग्य-पोषण आणि आर्थिक स्वावलंबन असे त्रिस्तरीय नियोजन करण्यात आले आहे. राज्यातील कोट्यवधी महिलांना बचत गटांसोबत जोडून त्यांना कायमस्वरूपी आर्थिक उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून देणारी लखपती दीदी योजना हे सरकारचे उद्दिष्ट लाडक्या बहिणींच्या यादीतून वगळल्या गेलेल्या, परंतु गरजवंत असलेल्या महिलांच्या उत्कर्षासाठी वरदान ठरणार आहे. वर्षाकाठी एक लाखांहून अधिक उत्पन्न मिळवून देण्याची हमी देणारी लखपती दीदी योजना फडणवीस सरकार गांभीर्याने राबवत असल्याने, राज्यातील ५० लाख महिला या योजनेतून आर्थिक स्वावलंबनाचा सुखद अनुभव घेऊ लागल्या आहेत. एक कोटी महिलांना लखपती बनविण्याचा या योजनेचा संकल्प असल्याने, महिलांच्या सक्षमीकरणाचा हा उद्यमशील मार्ग राज्यातील महिलांचा आत्मविश्वास वाढविणारा ठरेल; एक कोटी कुटुंबांच्या जीवनशैलीचा आलेख उंचावणारा ठरेल. ५० लाख महिलांच्या उत्पन्नाचा आकडा एक लाखांच्या घरात नेऊन ठेवणे ही बाब तेवढी साधी बाब नाही. देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने हा उच्चांक केव्हाच प्रस्थापित केला आहे ही आनंदाची बाब. महाराष्ट्राने याच्याही पुढे गेले पाहिजे. सरकारच्या तिजोरीतून दरमहा दीड हजारांची मदत घेऊन आपला आर्थिक स्तर उंचावण्यापेक्षा, आपल्या कष्टातून मिळविलेल्या घामाच्या पैशातून लक्षाधीश होण्याच्या समाधानाला स्वाभिमानाची झालर लाभेल, तेव्हा ते महिलांचे खरे सक्षमीकरण ठरेल. त्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा. ९२ लाख नावे वगळणे ही महाराष्ट्राच्या महिलांच्या आर्थिक उत्कर्षाच्या नव्या संधींची नांदी ठरणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या उमेद अभियानातूनही महिलांच्या बचत गटांचे सक्षमीकरण करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत महालक्ष्मी सरस सारख्या उपक्रमांतून बचत गटांच्या उत्पादनांना एक प्रतिष्ठा आणि ओळख प्राप्त झाली आहे. जनतेचा भरघोस पाठिंबा आणि सरकारचे संपूर्ण सहकार्य हा महिलांच्या आर्थिक उत्कर्षाचा योग्य मार्ग आहे, हे या अभियानाने सिद्ध केले आहे. नवी मुंबईत भरविण्यात आलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुमारे २५ कोटींची उलाढाल करून महिलांनी आपल्या आर्थिक क्षमतेची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण केली आहे. लाडकी बहीण योजनेतील जवळपास ३८ टक्के लाभार्थ्यांची नावे आता वगळण्यात आली आहेत. या महिलांना क्षमता सिद्ध करण्याची नवी क्षितिजे आमंत्रण देतील आणि त्यासाठी सज्ज झालेल्या महिला सक्षमीकरणाचे नवे मापदंड सिद्ध करतील, तेव्हा लाडकी बहीण योजनेतून नावे वगळल्याचा त्यांना खेद वाटणार नाही; उलट नवा मार्ग सापडल्याचा अभिमान महिलांमध्ये निर्माण होईल. महाराष्ट्रातील महिला या केवळ आर्थिक योजनांच्या लाभार्थी नसून आर्थिक विकासाचे इंजिन ठरावेत यासाठी अशा योजनांना गती देण्याची गरज सरकारने ओळखली, हे योग्यच झाले. अर्थसंकल्पातील निधीची तरतूद आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी यांची योग्य सांगड घातली गेली, तर महाराष्ट्र हे नेतृत्वक्षम महिलांच्या विकासाचे एक आदर्श राज्य ठरेल आणि राज्याची अर्थव्यवस्थाही निरोगी राहील.

यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. या निमित्ताने महिला शेतकऱ्यांचा सन्मान आणि त्यांचे सक्षमीकरण यांवर विशेष भर देण्याचा संकल्प सरकारने सोडला आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात उमेद अभियान योजनेस मान्यता देण्यात आल्यानंतर वर्षभरातच त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. महिला शेतकरी हा केंद्रबिंदू मानून पशुपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन अशा अनेक योजनांसाठी महिलांना सहकार्य करण्याच्या योजना अर्थसंकल्पातून सरकारने मांडल्या आहेत. उमेद अभियानातील उमेद मॉल नावाची संकल्पना हा त्याचा एक भाग आहे. महिला शेतकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान करण्याचा सरकारचा मानस विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकातूनही स्पष्ट झाला आहे. प्रत्यक्ष शेतीची मालकी नसली तरी कृषी क्षेत्रात सहभागी असलेल्या महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा हा नवा प्रयोग महाराष्ट्राच्या महिलांना नवे बळ देणारा ठरेल. महिलांच्या श्रमाला कायदेशीर पाठबळ देणाऱ्या या योजनेमुळे, शासकीय लाभांपासून वंचित राहणाऱ्या लाखो महिलांच्या श्रमाची प्रतिष्ठा वाढेल. म्हणूनच, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या यादीतून ९२ लाख नावे वगळल्याचा खेद नसावा. उलट यातील अनेक महिलांकरिता नव्या संधींचे दरवाजे उघडण्याचा आनंद मिळावा, असेच कुणालाही वाटेल. त्यासाठी सरकारला आणि महाराष्ट्रातील महिलांनाही क्षमता सिद्ध करावी लागेल. ■

## आंतरराष्ट्रीय

# राजसामरिक, आर्थिक, तांत्रिक साह्य

**प्रा. जयसिंग यादव**

भारत-जपान संबंधांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये कोणताही ऐतिहासिक संघर्ष नाही; उलट परस्परविश्वास, सांस्कृतिक जवळीक आणि विकासाभिमुख सहकार्याचा मजबूत पाया आहे. जपानने भारतातील पायाभूत सुविधा उभारणीत सातत्याने योगदान दिले आहे. दिल्ली मेट्रो, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन, औद्योगिक कॉरिडॉर, मालवाहतूक मार्ग, स्मार्ट सिटी प्रकल्प अशा अनेक योजनांमध्ये जपानची आर्थिक आणि तांत्रिक भागीदारी दिसून येते. आता या सहकार्याची व्याप्ती संरक्षण आणि उच्च तंत्रज्ञानापर्यंत विस्तारत आहे. अलिकडेच पार पडलेल्या शिखर परिषदेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संरक्षण सहकार्याला मिळालेली नवी गती. हिंद महासागरात संयुक्त नौदल सराव वाढविणे, सागरी सुरक्षेत समन्वय वाढविणे, युद्धनौकांच्या देखभालीतील सहकार्य आणि अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीबाबत दोन्ही देशांमध्ये अलिकडेच सहमती झाली. या निर्णयांचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये चीनने दक्षिण चीन समुद्र, पूर्व चीन समुद्र आणि हिंद-प्रशांत क्षेत्रात आपली लष्करी उपस्थिती मोठ्या प्रमाणावर वाढविली आहे. 'बेल्ट अँड रोड' उपक्रमाच्या माध्यमातून अनेक देशांमध्ये बंदरे, पायाभूत सुविधा आणि आर्थिक गुंतवणूक वाढवून चीनने प्रभाव विस्तारला आहे.

या पृष्ठभूमीवर भारत-जपान यांचे वाढते नौदल सहकार्य सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरते. तथापि, या सहकार्याचा उद्देश चीनविरोधी लष्करी आघाडी उभारणे हा नाही. भारत आणि जपान दोघेही मुक्त, खुला आणि नियमाधारित हिंद-प्रशांत या संकल्पनेवर भर देतात. आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर, नौवहन स्वातंत्र्य, समुद्री व्यापाराचे संरक्षण आणि प्रादेशिक स्थैर्य हे या भागीदारीचे मूलभूत तत्त्व आहे. त्यामुळे ही भागीदारी संघर्षाऐवजी संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न मानला पाहिजे. आर्थिक क्षेत्रातील करारांचे महत्त्वही कमी नाही. अलिकडेच जपानी उद्योगपतींच्या उपस्थितीत भारत आणि जपानदरम्यान शेकडो व्यावसायिक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. विशेषतः सेमीकंडक्टर, महत्त्वाची खनिजे, हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डिजिटल तंत्रज्ञान आणि संशोधन या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला. भारताने या क्षेत्रात जपानसारख्या तंत्रज्ञानसंपन्न देशाशी सहकार्य वाढविणे ही काळाची गरज आहे. मोठी बाजारपेठ, तरुण मनुष्यबळ, वाढती औद्योगिक क्षमता आणि स्थिर लोकशाही व्यवस्था यामुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र बनू शकतो. जपानची भांडवली गुंतवणूक आणि तांत्रिक कौशल्य या प्रक्रियेला वेग देऊ शकते. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांच्या यशासाठी केवळ सरकारी धोरणे पुरेशी नाहीत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, जागतिक दर्जाची उत्पादन क्षमता आणि दीर्घकालीन गुंतवणूक आवश्यक आहे. जपान या सर्व बाबतीत भारताचा विश्वासार्ह भागीदार ठरू शकतो. विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स, हरित ऊर्जा, बॅटरी तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन उद्योग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांच्या सहकार्यामुळे भारताला मोठा लाभ होऊ शकतो. जपानलाही या भागीदारीतून मोठा फायदा होणार आहे. भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. जपानी कंपन्यांसाठी भारत ही केवळ मोठी बाजारपेठ नाही, तर भविष्यातील उत्पादन आणि निर्यातीचे केंद्रही ठरू शकतो. चीनवरील औद्योगिक अवलंबित्व कमी करण्याच्या जपानच्या धोरणाला भारत महत्त्वपूर्ण आधार देऊ शकतो. भारताच्या परराष्ट्र धोरणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे 'रणनीतिक स्वायत्तता.' भारत कोणत्याही एका महासत्तेवर अवलंबून न राहता अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, जपान, युरोपीय संघ आणि पश्चिम आशियातील देशांशी स्वतंत्र संबंध मजबूत करत आहे.

असे असले तरी कोणत्याही शिखर परिषदेनंतर खरा प्रश्न करारांच्या अंमलबजावणीचा असतो. अनेकदा मोठमोठ्या घोषणा होतात; मात्र त्या प्रत्यक्षात येण्यास विलंब होतो. गुंतवणूक प्रत्यक्ष उद्योगांमध्ये उतरेल, तेव्हाच भारत-जपान भागीदारीचे खरे यश दिसेल. भारत-जपान भागीदारीचा परिणाम केवळ द्विपक्षीय संबंधांपुरता मर्यादित राहणार नाही. या सहकार्यामुळे संपूर्ण हिंद-प्रशांत प्रदेशातील सामरिक संतुलन मजबूत होईल. लहान आशियाई देशांनाही यामुळे विश्वासार्ह पर्याय उपलब्ध होईल. लोकशाही मूल्ये, नियमाधारित व्यवस्था, सुरक्षित समुद्री व्यापार आणि शाश्वत आर्थिक विकास या चार स्तंभांवर आधारित नवी प्रादेशिक रचना उभारण्याची क्षमता या भागीदारीमध्ये आहे. आज जग नव्या शक्तिसंतुलनाकडे वाटचाल करत आहे. अशा वेळी भारत आणि जपान यांची वाढती जवळीक ही कोणत्याही देशाविरोधातील आघाडी नसून स्थिर, सुरक्षित आणि समृद्ध हिंद-प्रशांत घडवण्याचा दूरदृष्टीचा प्रयत्न आहे. आगामी दशकात ही भागीदारी आशियाच्या नव्या सामरिक व्यवस्थेचा एक प्रमुख आधारस्तंभ ठरली, तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण राहणार नाही.

जागतिक राजकारणात काही घटना तत्काळ मथळे बनत नाहीत; परंतु पुढील अनेक दशकांच्या भू-राजकीय समीकरणांची दिशा ठरवतात. भारत आणि जपान यांच्यात नुकत्याच झालेल्या १६ व्या वार्षिक शिखर परिषदेकडे अशाच दृष्टीने पाहण्याची गरज आहे. ही परिषद केवळ दोन देशांमधील द्विपक्षीय चर्चेपुरती मर्यादित नसून बदलत्या जागतिक व्यवस्थेत हिंद-प्रशांत प्रदेशातील सामरिक, आर्थिक आणि तांत्रिक सहकार्याची नवी चौकट तयार करणारी ठरू शकते. आज जग एका संक्रमणाच्या टप्प्यावर उभे आहे. अमेरिका आपल्या परराष्ट्र धोरणाचा नव्याने विचार करत आहे, चीन आशिया आणि हिंद-प्रशांतमध्ये आर्थिक आणि लष्करी प्रभाव झपाट्याने वाढवत आहे, तर युरोपही भारताशी संबंध दृढ करण्याच्या प्रयत्नात आहे. अशा परिस्थितीत भारत आणि जपान या दोन लोकशाही राष्ट्रांनी अधिक जवळ येण्याचा निर्णय हा केवळ योगायोग नसून काळाची गरज आहे. या शिखर परिषदेत संरक्षण सहकार्याला विशेष महत्त्व देण्यात आले. हिंद महासागरातील संयुक्त नौदल सराव, सागरी सुरक्षेतील समन्वय, युद्धनौकांच्या देखभालीतील सहकार्य तसेच प्रगत संरक्षण तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाबाबत दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. यावरून भारत आणि जपान यांचे संबंध केवळ राजनैतिक पातळीवर न राहता दीर्घकालीन सामरिक भागीदारीमध्ये रूपांतरित होत असल्याचे स्पष्ट होते. हिंद-प्रशांत प्रदेश आज जागतिक व्यापाराचा केंद्रबिंदू बनला आहे. जगातील मोठ्या प्रमाणावरील ऊर्जा आणि मालवाहतूक या समुद्री मार्गांवरूनच होते. या मार्गांची सुरक्षितता केवळ भारत किंवा जपानसाठी नव्हे, तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे या प्रदेशात मुक्त, नियमाधारित आणि सुरक्षित समुद्री व्यवस्था निर्माण करण्यासाठी दोन्ही देशांचे सहकार्य निर्णायक ठरणार आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# गोंदण आणि टॅट्यूचे दुष्परिणाम

शरीराच्या त्वचेवर कोरलेले गोंदण हा केवळ शरीरावरील अलंकार नसून मानवी संस्कृतीचा, सामाजिक रचनेचा, धार्मिक विश्वासाचा जिवंत दस्तऐवज आहे. मानववंशशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर गोंदण ही एक शारीरिक भाषा आहे. माणूस बोलण्याआधी चिन्हे वापरत होता त्यापैकी एक म्हणजे शरीरावर कायमस्वरूपी कोरलेले नक्षीकाम. भारतात सिंधू संस्कृतीतील मूर्तींवर, प्राचीन शिल्पांवर लोकपरंपरांमध्ये शरीरालंकरणाचे अनेक पुरावे आढळतात. जरी टॅट्यूचे थेट पुरावे मर्यादित असले, तरी लोकसंस्कृतीत गोंदणाला हजारो वर्षांची परंपरा लाभली आहे. शरीरावरील प्रत्येक चिन्ह काही ना काही संदेश देत असे. उदाहरणार्थ व्यक्ती कोणत्या जमातीची आहे. तिचे वैवाहिक स्थान काय आहे वगैरे. भारतातील गोंदण परंपरा सर्वाधिक आदिवासी समाजात आढळते. गोंड समाजामध्ये गोंदण हे सौंदर्य, धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक होते. स्त्रिया हात, पाय, मान, कपाळावर विशिष्ट भूमितीय नक्षी गोंदवत. बंजारा महिलांच्या गोंदणात मोर, फुले, वेली, सूर्य, चंद्र आणि धार्मिक प्रतीकांचा वापर होत असे. महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशातील भील समाजात गोंदणाला संरक्षणात्मक धार्मिक महत्त्व होते. काही चिन्हे वाईट शक्तींपासून रक्षण करतात, अशी श्रद्धा होती. महाराष्ट्रातील गोंड, कोरकू, धनगर, कोळी, ठाकूर, बंजारा आणि इतर समाजांमध्ये गोंदणाला विशेष स्थान होते. जत्रा, यात्रा धार्मिक उत्सवांमध्ये गोंदण करणाऱ्या स्त्रिया गावोगावी फिरत असत. राम, विठ्ठल, ओम, त्रिशूळ, स्वस्तिक, देवीची पावले अशी चिन्हे हातावर किंवा दंडावर गोंदवली जात. अनेक भागांत मुलीच्या विवाहापूर्वी गोंदण करणे ही सामाजिक प्रथा मानली जात असे. पंढरपूर, जेजुरी, माहूर, तुळजापूर, शेगाव, अंबाबाई, खंडोबा, संतांच्या यात्रांमध्ये गोंदण करणारे कारागीर मोठ्या संख्येने येतात. आधुनिकीकरणामुळे बदललेली परंपरा गेल्या चार दशकांत गोंदण परंपरेत मोठा बदल झाला आहे. शहरीकरण, आधुनिक फॅशन वाढल्याने पारंपरिक गोंदण कमी झाले. त्याची जागा आधुनिक टॅट्यूंनी घेतली. धार्मिक प्रतीकांच्या जागी इंग्रजी अक्षरे, पोर्ट्रेट, आधुनिक कलात्मक डिझाईन रंगीत टॅट्यू लोकप्रिय झाले. आजच्या तरुणाईमध्ये टॅट्यू म्हणजे केवळ फॅशन नसून ती व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली आहे. हात, मान, छाती, पाठ, मनगट, पाय अशा शरीराच्या विविध भागांवर कायमस्वरूपी किंवा तात्पुरते टॅट्यू काढण्याची स्पर्धाच दिसून येते. सोशल मीडियावर सेलिब्रिटी, खेळाडूंच्या प्रभावामुळे टॅट्यूचे आकर्षण आणखी वाढले आहे.

टॅट्यू शाईतील रासायनिक विज्ञान गुंतागुंतीचे आहे. टॅट्यूची शाई म्हणजे साधा रंग नसतो. ती रंगद्रव्ये रासायनिक मिश्रणांनी तयार केलेली असते. त्वचेच्या थरात ही शाई आयुष्यभर राहते, त्यामुळे तिच्या गुणवत्तेला, रासायनिक रचनेला विशेष महत्त्व आहे. आधुनिक टॅट्यू उद्योगाला १९७० नंतर पाश्चिमात्य देशांमध्ये टॅट्यूला नवीन ओळख मिळाली. संगीत, चित्रपट, खेळ आणि फॅशन उद्योगातील प्रसिद्ध व्यक्तींनी टॅट्यू स्वीकारल्यानंतर त्याची लोकप्रियता वाढत गेली. भारतामध्ये १९९० नंतर इंटरनेट व सोशल मीडियाच्या युगात टॅट्यू स्टुडिओंची संख्या झपाट्याने वाढली. आज महानगरांपासून शहरांपर्यंत आधुनिक टॅट्यू स्टुडिओ उपलब्ध आहेत. टॅट्यू उद्योगाची आर्थिक उलाढाल कोटी रुपयांचा जागतिक उद्योग बनला आहे. टॅट्यू मशीन, सुया, रंग, त्वचा-देखभाल उत्पादने, प्रशिक्षण संस्था, डिझाईन सॉफ्टवेअर, लेझर रिमूव्हल केंद्रे, ऑनलाईन डिझाईन प्लॅटफॉर्म यामुळे संपूर्ण उद्योग साखळी निर्माण झाली आहे. भारतातही प्रशिक्षित टॅट्यू कलाकार, डिजिटल डिझाईन, आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टुडिओ विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. नवीन संशोधनानुसार शरीरावर गोंदवून घेतल्याने आरोग्य तज्ज्ञांच्या मते टॅट्यू काढण्याचा विचार करणाऱ्या प्रत्येकाला स्वच्छता आणि शाईमधील घटकांविषयी टॅट्यू काढणाऱ्यांशी बोलण्याचा सल्ला देतात, ज्यांची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत आहे. त्यांनी टॅट्यू काढण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अशी शिफारस तज्ज्ञ करतात. सध्या माणसांमध्ये टॅट्यू आणि कर्करोग यांचा संबंध जोडणारा कोणताही निश्चित पुरावा नसला, तरी काही अभ्यासकांनी टॅट्यू काढलेल्या व्यक्तींमध्ये त्वचेच्या कर्करोगाचा धोका जास्त असल्याचे दाखविले आहे. याचबरोबर बेकायदेशीर, अप्रमाणित स्वस्त दरात टॅट्यू करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे, ही चिंतेची बाब आहे. शास्त्रज्ञांनी टॅट्यू मानवी शरीरावर कायमस्वरूपी गंभीर परिणाम करतात, असा इशारा दिला आहे. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# कामगार आंदोलनास कारण की...

**दत्तात्रेय आंबुलकर**

औद्योगिक क्षेत्रात कामगारांचे संप-आंदोलन हे प्रकार नवे नाहीत. कामगारांच्या जीवनाशी निगडित व जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर तोडगा निघावा, यासाठी कामगारांना छोट्या-मोठ्या स्वरूपात आंदोलनाचा मार्ग चोखाळावा लागणे, हे प्रकार सर्वमान्य स्वरूपाचे ठरले आहेत. मात्र, विशेषतः गेल्या दोन महिन्यांत देशाच्या विशिष्ट औद्योगिक क्षेत्रात कामगार आंदोलनाचा जो व्यापक भडका उडला, तो कामगार-व्यवस्थापन व शासन-प्रशासन या सर्वच संबंधित घटकांना या विषयाकडे गांभीर्याने पाहण्यासाठी बाध्य करणारा ठरला. या निवडक; पण दाहक स्वरूपातील आंदोलनाच्या भडक्याची पृष्ठभूमी समजून घ्यायला हवी. या हिंसक व नुकसानकारी आंदोलनांची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे, त्यांचे नेतृत्व व या प्रकरणी घेतलेला पुढाकार हा परंपरागत कामगार संघटनांच्या जोडीलाच स्थानिक व औद्योगिक क्षेत्रातील नव्या चळवळ्या नवनेतृत्वाचा होता. त्यांना प्रचलित कामगार आंदोलन पद्धतीची पृष्ठभूमी नव्हती. त्यामुळे या निवडक व नियोजनपूर्ण पद्धतीने केलेल्या मर्यादित आंदोलनांची परिणती स्वाभाविकपणे भडक्यात झाली. एका ठिकाणी तर कंपनीने नोकरीवरून कमी केल्याने बेकार झालेल्या, बेकारीपोटी आलेल्या उद्वेगातून या कामगाराने कंपनीच्या तयार मालाच्या गोडावूनलाच आग लावून आपण आणि कंपनी या उभयतांचे भविष्य बेचिराख करण्याचा आक्रस्ताळेपणाचा प्रकार याचदरम्यान झाल्याची बातमी गाजली. यासंदर्भात आणि विशेषतः स्वातंत्र्यपूर्व काळातील म्हणजेच, १९२६ च्या कामगार संघटनाविषयक कायद्याची यंदा शताब्दी होत असताना, कामगार संघटना व आंदोलने या महत्त्वाच्या विषयाकडे मुळातून व गांभीर्याने पाहणे महत्त्वाचे ठरते.

यासंदर्भात कामगार संघटना म्हणून अशा भूमिका मांडताना 'मजदूर किसान शक्ती संघटने'चे सहसंस्थापक निखिल डे यांनी नमूद केल्यानुसार, कुठल्याही कामगार अथवा कर्मचाऱ्याला आपल्या कामाच्या ठिकाणी तोडफोड अथवा जाळपोळ करायची नसते. आपले जगणे व उदरनिर्वाह यावरच अवलंबून आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव असते. मात्र, त्यांना ते करीत असताना कामकाजात आवश्यक प्रगती व वाटचाल न दिसून आल्यास मात्र त्यांच्या संयमाचा बांध फुटू शकतो.




अशाच प्रकारे कामगारांच्या आंदोलक प्रकारांची पुनरावृत्ती नोएडा औद्योगिक क्षेत्रातील हिंसक आंदोलनापूर्वी बरौनी-बिहार, सुरत-गुजरात व मनेसर आणि पानिपत-हरयाणा या देशातील प्रमुख व निवडक औद्योगिक वसाहतींमध्ये झाली होती, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या घटनाक्रमामागील वैयक्तिक व महत्त्वाचा आर्थिक पैलू म्हणजे आखाती युद्धामुळे घरगुती गॅसपासून इतर सर्वच उपयोगी वस्तूंची अचानक झालेली भाववाढ व यापैकी काही वस्तूंची टंचाई याबाबी कामगारांच्या आंदोलनाची तीव्रता वाढविण्यास अधिक पूरक ठरण्याचे सांगण्यात येते. यामध्ये काही प्रमाणात तथ्यांश असला, तरी कामगारांचे अशा प्रकारे विध्वंसक आंदोलन करण्यामागे इतरही काही महत्त्वाची कारणे आहेत. कामगारांच्या व्यक्तिगत स्तरावर सांगायचे म्हणजे, संघटित क्षेत्रातील वा मोठ्या कंपन्या सोडल्यास मध्यम आकारातील कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची अवस्था चिंतनीय आहे. त्यातही कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्यांची अवस्था बहुतांशपणे अधिकच चिंतनीय असते. यामध्ये जुजबी वा प्रसंगी किमान वेतन कायद्यापेक्षाही कमी व बरेचदा अनियमितपणे मिळणारे वेतन, कामाचे अतिरिक्त तास आणि त्यासाठी घ्यावा लागणारा ताण, कामाच्या ठिकाणी स्वच्छता व मूलभूत आरोग्यासाठी आवश्यक मूलभूत व कायदेशीर सोयींची पूर्तता नसणे, या बाबींचा सामना अधिकांश उद्योग व औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना करावा लागतो. यासंदर्भात काही महिन्यांपूर्वी म्हणजे फेब्रुवारी २०२६ मध्ये 'टीट वॉच' ही सामाजिकसंदर्भात जागृती करणारी संस्था व मुंबईच्या 'टाटा सामाजिक संशोधन संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेल्या तयार कपडे उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या ११५ कामगारांच्या मुलाखतींवर आधारित अभ्यास-अहवाल तयार करण्यात आला. या अभ्यासात नमूद केल्यानुसार, या क्षेत्रात काम करणाऱ्या बहुसंख्य म्हणजेच, सुमारे ७८ टक्के कामगारांना कामाच्या वेळी नैसर्गिक विधीसाठी पूर्वपरवानगी घ्यावी लागते व प्रत्येक वेळी ती मिळतेच असे नाही. या कामगारांपैकी लक्षणीय म्हणजेच, सुमारे ६८ टक्के कामगारांना अत्यधिक गरम-उष्ण वातावरण आणि परिसरात काम करावे लागते. याचाच परिणाम म्हणून, या आणि अशा प्रकारची कामे करणाऱ्या कामगारांना मोठ्या प्रमाणात आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागतो व प्रसंगी बिनपगारी रजा घ्यावी लागते. औद्योगिक कामगारांच्या संदर्भात त्यांना मिळणारे वेतन हा त्यांच्या दृष्टीने सर्वात मोठा व जिव्हाळ्याचा मुद्दा ठरला आहे. याला अर्थातच, दीर्घकाळ चाललेल्या आखाती युद्धाची पृष्ठभूमी लाभली आहे. या पृष्ठभूमीवर हरयाणा सरकारने राज्याच्या औद्योगिक कामगारांच्या मूलभूत वेतनात वाढीव स्वरूपाची अशी ३५ टक्के वेतनवाढ जाहीर करून अमलात आणली आहे. याचाच परिणाम हरयाणा आणि परिसरातील राज्यांमधील औद्योगिक कामगारांची वेतन तफावत अपरिहार्यपणे वाढण्यात झाली आहे. याचाच परिणाम ज्वलंत स्वरूपात लगतच्या उत्तर प्रदेशातील नोएडा, मनेसर यांसारख्या मोठ्या औद्योगिक परिसरात काम करणाऱ्या कामगारांवर अपरिहार्यपणे झालेला पाहायला मिळाला. राजधानी दिल्लीपासून जवळच असणाऱ्या राजस्थानमध्ये तर तेथील औद्योगिक कामगारांच्या मूलभूत वेतनात गेली १० वर्षे वाढ झालेली नसल्याची वस्तुस्थिती यानिमित्ताने स्पष्ट झाली आहे.

कामगारांना अतिरिक्त तास काम करून पण कायदेशीरपणे वेतन न मिळण्याच्या तक्रारी अधिकांश ठिकाणी आहेत. विषयतज्ज्ञांच्या मते, सद्यस्थितीत देशांतर्गत औद्योगिक कामगारांपैकी अधिकांश म्हणजेच, सुमारे ५१ टक्के कामगार आठवडी निर्धारित म्हणजेच, ४९ तासांपेक्षा अधिक तास काम करीत आहेत. मात्र, याची परिणती कामगारांचे काम आणि उत्पादकता यांच्या वाढीत होत नाही. याचीच परिणती कामगार संघटना आणि त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव बाजूला राहून कामगार हिंसक आणि भडकावू आंदोलनांना बळी पडू शकतात, हीच बाब यावेळी भडकलेल्या कामगार आंदोलनांनी स्पष्ट झाली आहे. यातून कंपनी-व्यवस्थापनांनी पण धडा घेणे आवश्यक असून, नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीने हे उद्देश साध्य होतील, अशी अपेक्षा आहे. ■

९८२२८४७८८६

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

### मनपा पुन्हा झोपी जाईल काय?

सध्या ठेकेदारांनी किंवा खाजगी बांधकाम व्यावसायिकांनी रस्त्यावर टाकून ठेवलेल्या बांधकाम साहित्यामुळे होत असलेल्या त्रासाचा 'तरुण भारत'ने सुरू केलेला उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आणि स्तुत्य आहे. पहिल्याच दिवशी बातम्या आणि फोटो प्रसिद्ध झाल्यानंतर मनपाने केलेल्या कारवाईच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्यावरून या उपक्रमाचा परिणाम दिसला. महानगरपालिकेने या कारवाईचा धडका सुरू करून ७० हजार रुपये कंत्राटदारांच्या खिशातून काढले! मनपाने दंड वसूल केला म्हणजे सामान्य नागरिकांच्या समस्या सुटल्या, असे म्हणता येईल का? जितके फोटो वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले, त्या ठिकाणचे ते बांधकाम साहित्य त्या बांधकाम कंत्राटदाराने तिथून उचलले आहे का? किंवा अन्य ठिकाणचे उचलले जात असल्याचे दिसत आहे काय, हा खरा प्रश्न आहे. मनपाच्या सर्जिकल स्ट्राईकमुळे रस्ता, फूटपाथ मोकळा झाला आहे का? नियमावर बोट ठेवून केवळ दंड वसूल करणे हे मनपाचे काम आणि हाच मनपाच्या उत्पन्नाचा स्रोत नक्कीच नसावा.

माझ्या घरासमोर सध्या घर पाडण्याचे काम सुरू आहे. काम व्यवस्थित सुरू आहे. त्याच्याबद्दल आम्हाला सध्या काहीही तक्रार नाही. पण कालच मनपा कर्मचारी आजूबाजूच्या शेजाऱ्यांकडे चौकशी करीत आले होते. तुम्ही तक्रार का नाही केली, असे म्हणत होते. म्हणजे नागरिकांनी तक्रार करायची आणि त्या घरमालकाला त्रास देण्यासाठी यांच्या हाती आयते कोलीत द्यायचे! असे कर्मचारी हीच खरी समस्या आहे. चुकीच्या गोष्टींसाठी दंड केला म्हणजे न्याय झाला असे होत नाही. दंड भरून ते रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवणारे कंत्राटदार दंड भरल्याचा कागद फडकवत शिरजोर होणार असतील आणि सर्रास रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवणार असतील तर काय उपयोग? रस्त्यावरचे बांधकाम साहित्य हलवले गेले तरच मनपाने जनसामान्यांना दिलासा देणारे काम केले असे समजता येईल. तसे झाले नाही तर मनपा प्रशासन नेहमीप्रमाणे पुन्हा झोपले असे होईल. तरुण भारतने हा जो प्रयत्न केला त्याबद्दल त्यांचे पुनश्च एकदा अभिनंदन!

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/नागपूर। ९८२२५६९६४८

## वाचक पत्रे

### यास्तिका भाटियाचे पहिले शतक

सध्या इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या महिला क्रिकेट कसोटीमध्ये भारताची यष्टिरक्षक फलंदाज यास्तिका भाटिया हिने रविवारी लॉर्ड्स मैदानावर झळकावलेले शतक अप्रतिम होते. मूळ बडोद्याच्या असलेल्या यास्तिकाने केलेल्या ११३ धावात संयम आणि आक्रमकता यांचा सुरेख संगम दिसला. दोन क्षेत्ररक्षकांमधून जाणारे चौकार आणि प्रसंगी प्रतिस्पर्धी गोलंदाजाच्या डोक्यावरून मारलेले फटके रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. भारताची अनुभवी डावखुरी स्मृती मानधनाच्या फलंदाजीतील नजाकत आणि अचूकता जरी भाटियाच्या फलंदाजीत पुरेपूर नसली, तरी आपल्या चौथ्याच कसोटीत तिने दाखविलेली परिपक्वता आणि एकाग्रता निःसंशय प्रशंसनीय आहे.

२०२३ नंतर कसोटी संघात पुन्हा संधी मिळालेल्या भाटियाने चक्क इंग्रजांच्या भूमीत तेही लॉर्ड्स मैदानावर शतक झळकवले आणि तिचे नाव सन्माननीय क्रिकेटर्सच्या यादीत 'लॉर्ड्स'च्या भव्य फलकावर कोरले गेले. इंग्लंडमध्ये सध्या सुरू असलेल्या भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या लाजिरवाण्या कामगिरीच्या पृष्ठभूमीवर महिला क्रिकेट संघाचा लॉर्ड्स मैदानावरील खेळ भारतीयांना अभिमानास्पद असा आहे. इंग्रजांनी इंग्लंडमध्ये सुरू केलेल्या या खेळामध्ये भारताच्या क्रिकेटर्सनी आपले विशेष मानाचे स्थान निर्माण केले आहे आणि त्याचा एक भारतीय सगळ्यांनाच अभिमान आहे. लॉर्ड्सवरील या शतकाबद्दल यास्तिका हरीश भाटिया हिचे मनापासून अभिनंदन!

**प्रा. विवेक विश्वरूपे**/८८०५१५७४७५

■■■

### वारीची अभंग निष्ठा

आळंदी आणि देहू येथून निघणारी संत ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरु तुकाराम महाराज यांची पालखी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा महाप्राण आहे. जात, पात, वय आणि श्रीमंती-गरिबीच्या भिंती गळून पडलेला हा एक असा अनुपम सोहळा आहे, जिथे मानवी मूल्यांचे सर्वात सुंदर दर्शन घडते. वारी म्हणजे केवळ पंढरपूरच्या दिशेने पडणारी पावले नव्हेत, तर तो शतकानुशके चालत आलेला समतेचा, बंधुभावाचा आणि असीम श्रद्धेचा अखंड प्रवास आहे. दरवर्षी लाखो वारकरी या प्रवासात स्वतःला विसरून विठ्ठलनामात तल्लीन होतात. यंदा मात्र या वारीच्या वाटेवर निसर्गाने एक मोठे आव्हान उभे केले आहे. पाण्याचा वेढा पडलेला असतानाही कुठेही गोंधळ झाला नाही. वारकरी एकमेकांचा हात धरून, परस्परांना धीर देत सुरक्षित स्थळी सरकत राहिले. अन्नछत्रांमध्ये भोजन वाटप असो वा औषधोपचार, प्रत्येकाने अत्यंत शांततेत आणि सेवाभावाने परिस्थिती हाताळली. हाच तो वारीचा खरा संस्कार आहे, जो संकटात माणसाला माणूस म्हणून जगायला आणि लढायला शिकवतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने आपण कितीही प्रगती केली, तरी निसर्गाच्या एका झटक्यासमोर आपण किती लहान आहोत, याची नम्र जाणीव या घटनेने करून दिली आहे. प्रशासनाने अशा मोठ्या सोहळ्यांसाठी कायमस्वरूपी सुविधांची निर्मिती करावी. ■

**वीरेंद्र सोनवणे** /पुणे।८८८८२४४८८३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीड येथे कृषी विभागाचे 'क्रॉपसॅप' अंतर्गत खरीप हंगाम प्रशिक्षण संपन्न; कीड-रोग नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना करण्याचे आवाहन!

## अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला उपविभागीय स्तरावर कार्यशाळा; पीक संरक्षणाबाबत तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

**बीड ( प्रतिनिधी):** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पिकांवरील कीड आणि रोगांचे वेळीच सर्वेक्षण व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विशेष पाऊल उचलण्यात आले आहे. उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, बीड अंतर्गत 'कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प' (क्रॉपसॅप) या मोहिमेअंतर्गत सन २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १० जुलै २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता अहिल्यानगर रोड, म्हसोबा फाटा येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर अन्न तंत्र व कृषी महाविद्यालय येथे उत्साहात पार पडला.

**सविस्तर प्रास्ताविक आणि उद्देश:**

कार्यक्रमाची सुरुवात उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे यांच्या सविस्तर प्रास्ताविकाने झाली. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात क्रॉपसॅप प्रकल्पाची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली. खरीप हंगामात कापूस, सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांवर येणाऱ्या संभाव्य कीड व रोगांचे वेळेत सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना अचूक सल्ला देणे काळाची गरज आहे, असे सांगत त्यांनी या मोहिमेत गावपातळीवर पातळीवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.

तज्ज्ञ मार्गदर्शकांचे विचार व तांत्रिक सल्ला

या कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले.



**डॉ. बी. पी. गायकवाड (शास्त्रज्ञ पीक संरक्षण, केव्हीके खामगाव):** त्यांनी पिकांवरील विविध कीड प्राथमिक लक्षणांची ओळख कशी करावी, याबद्दल सविस्तर माहिती दिली. हवामान बदलामुळे बदलणाऱ्या किडींच्या प्रादुर्भावावर जैविक आणि रासायनिक नियंत्रण पद्धतींचा समतोल वापर कसा करावा, याचे तंत्र त्यांनी समजावून सांगितले.

**डॉक्टर भानुदास भोंडे (जिल्हा समन्वयक, कृषी महाविद्यालय आंबेजोगाई):** त्यांनी शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि कीड सर्वेक्षणाची अचूक पद्धत यावर प्रकाश टाकला. क्रॉपसॅप अंतर्गत गोळा होणारी माहिती ही अचूक असावी, जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य मार्गदर्शन मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

**डी.व्ही. जाधवर (कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय बीड):** त्यांनी कृषी विभागाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या धोरणात्मक बाबींवर मार्गदर्शन केले. तसेच, क्षेत्रीय स्तरावर काम करताना कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संपर्क साधून त्यांच्यात जनजागृती निर्माण करावी, जेणेकरून खरीप हंगामात पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल, असा सल्ला त्यांनी दिला.

या जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने तंत्र अधिकारी गणेश वाघ, बीडचे तालुका कृषी अधिकारी ए. व्ही. साळी, शिरूर कासार येथील ए. सी. गांगर्डे, तंत्र अधिकारी आर. जी. मगर तंत्र सहाय्यक सय्यद यांच्यासह उपविभागातील मंडल कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अर्जुन चव्हाण यांनी केले. कार्यशाळेच्या सांगतेप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले. या प्रशिक्षणाचा फायदा आगामी खरीप हंगामात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिकांचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये लोकसहभाग आवश्यक - चंद्रकांत शेळके

**बीड (प्रतिनिधी):-** एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये नागरिकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे कारण यामुळे प्रशासनाला अचूक, माहिती मिळण्यास मदत होते. या राष्ट्रीय कार्यात नागरीकांचा लोकसहभाग अत्यंत महत्वाचा आहे असे प्रतिपादन तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी केले.

बीड शहरातील वार्ड क्र. बीड शहरातील वॉर्ड क्रमांक 25 मध्ये ‘एसआयआर मॅपिंग’ नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे आयोजन युवा नेते नगरसेवक अ‍ॅड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय येथे दि.11 व 12 जुलै रोजी करण्यात आले होते. या प्रसंगी बीडचे तहसिलदार चंद्रकांत शेळके यांना प्रमुख पाहुणे म्हणून अमंत्रित करण्यात आले होते. यावेळी भाजपा नगरसेवक अ‍ॅड. गोविंद शिराळे पाटील यांनी तहसिलदार शेळके शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी तहसिलदार चंद्रकांत शेळके म्हणाले की, स्थानिक रहिवाशांना त्यांच्या परिसराची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती अचूक माहीत असते.नागरिकांकडून बीएलओ, निरीक्षकांना माहिती मिळाल्याने प्रशासकीय कामात पारदर्शकता येते असे सांगून एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये लोकसहभाग महत्वाचा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी नागरीकांशी संवाद साधतांना लोकाभिमुक कार्यतत्पर नगरसेवक अ‍ॅड. गोविंद शिराळे यांनी तहसीलदार चंद्रकांतजी शेळके यांच्या समक्ष प्रशासनाला आवर्जून सांगितले की, राष्ट्र उभारणीच्या या दिव्य कामांमध्ये एक लोकप्रतिनिधी व लोकसेवक म्हणून माझे कार्यालय व येथील सर्व यंत्रणा हे यापुढेही संपूर्ण विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम संपेपर्यंत प्रभाग क्रमांक 25 मधील नागरिकांसाठी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी सतत 24 तास उपलब्ध आहे. यापुढेही कोणालाही काहीही अडचण असल्यास त्यांनी तात्काळ माझ्या 8888555991 या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा तसेच त्यांना तात्काळ मदत केली जाईल. असे आश्वासन युवा नेते कर्तव्यदक्ष नगरसेवक अ‍ॅड. गोविंद भैया शिराळे पाटील यांनी व्यक्त केले. वार्ड क्रमांक 25 व बीड शहरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, पत्रकार, डॉक्टर, वकील, समाजसेवक, प्राध्यापक, प्रतिष्ठित नागरिक, वार्ड क्रमांक 25 व बीड शहरातील मतदार यांच्यावतीने, एस आर मॅपिंग शिबिराचे केलेले योग्य अशी बैठक व्यवस्था व सर्व सुविधायुक्त उत्कृष्ट नियोजन याबद्दल वरील सर्वांनी युवा नेते नगरसेवक अ‍ॅड. गोविंद भैया शिराळे यांचे कौतुक करून जाहीर सत्कार केला. यावेळी नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता अजून एक दिवस शिबीराचा कालावधी करण्यात आला. एसआयआर मॅपिंग शिबिर यशस्वी करण्यासाठी बहुमोल परिश्रम घेणाऱ्यांचे अ‍ॅड. गोविंद शिराळे पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# बीड पोलिसांचे ‘डीपआय एआय’ राज्यभरासाठी आदर्श ठरणार

## राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीकडून कौतुक

**बीड :** गुन्हे तपास अधिक वेगवान, अचूक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्याच्या दिशेने बीड पोलिसांनी विकसित केलेल्या ‘डीपआय एआय’ या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तपास प्रणालीने राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीची प्रशंसा मिळवली आहे. पोलीस तपास प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणारा हा प्रकल्प महाराष्ट्रातील आधुनिक पोलिसिंगसाठी नवा मापदंड ठरण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी नुकतीच राज्यस्तरीय समिती बीडमध्ये दाखल झाली होती. ही समिती आपला अहवाल वरिष्ठांना सादर करणार आहे.

या प्रकल्पाअंतर्गत गुन्हेगारांचा डिजिटल गुन्हेगारी इतिहास, हिस्ट्रीशीटर, गुंडा रजिस्टरमधील आरोपींची माहिती तसेच संघटित गुन्हेगारीच्या हालचालींचे विश्लेषण करणारी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या साहाय्याने एमपीडीए अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पात्र प्रकरणे तसेच मोक्का अंतर्गत तपासाची आवश्यकता असलेल्या टोळ्या आणि आरोपींची संभाव्य प्रकरणे स्वयंचलितपणे ओळखणे शक्य होणार आहे.

प्रणालीमध्ये Preventive Action Chart, Criminal Antecedent Search आणि Multi-Accused Role Analysis यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आरोपींचा गुन्हेगारी इतिहास, गुन्ह्यातील भूमिका आणि संघटित गुन्हेगारीशी असलेले संबंध तपास अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. याशिवाय, बीड जिल्ह्यात २०१७ पासून नोंदविण्यात आलेले सर्व एफआयआर आणि ८०० हून अधिक आरोपपत्रांचा (Charge Sheets) समावेश Al Knowledge Base मध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे तपास नियोजन, कागदपत्रांची निर्मिती, कायदेशीर विश्लेषण आणि निर्णय प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रभावी सहाय्य मिळणार आहे.

या प्रकल्पात एफएसएल, दूरसंचार सेवा पुरवठादार, बँका आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी स्वयंचलित अधिकृत पत्रनिर्मिती, लाईव्ह लोकेशन सहाय्य, गुन्हेगारी नमुना विश्लेषण, पुरावा व्यवस्थापन, ऑन-साइट डेटा संरक्षण, ई-कोर्ट समन्वय, समान न्यायनिर्णयांचे विश्लेषण आणि सुरक्षित डेटा साठवण अशा अनेक अत्याधुनिक सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे. राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीने या प्रकल्पाचे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, कायदेशीर सुसंगती, डेटा सुरक्षा, वापरातील सुलभता आणि तपासातील उपयुक्तता या निकषांवर सखोल मूल्यमापन केले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकानंतर समितीने DeepEye Al च्या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे विशेष कौतुक करत, ६५ चाचणी प्रकरणांमधील (Test Cases) तांत्रिक क्षमता आणि तपासातील परिणामकारकत बाबत सकारात्मक अभिप्राय नोंदविला.

# अंबाजोगाई आगाराला मिळाल्या 5 नव्या 'राजमाता जिजाऊ' बस; आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई आगारातील जुन्या आणि नादुरुस्त बसमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांची होणारी मोठी गैरसोय लक्षात घेऊन नमिता मुंदडा यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. अंबाजोगाई बस आगारासाठी नव्याने ५ 'राजमाता जिजाऊ' बस उपलब्ध झाल्या असून, यातील दोन बस आगारात दाखल झाल्या आहेत. उर्वरित तीन बस उद्या सकाळपर्यंत पुण्यातून पोहोचणार आहेत. उद्या सकाळी ११ वाजता या नव्या बसचे रीतसर पूजन केले जाणार असल्याची माहिती आगार प्रमुख अमर राऊत यांनी दिलीं .



अनेक दिवसांपासून ग्रामीण भागातील प्रवाशांना जुन्या व खिळखिळ्या झालेल्या बसमुळे प्रवासात प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि सोयीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. नागरिकांची ही रोजची फरफट आणि असुरक्षितता ओळखून नमिता मुंदडा यांनी एसटी महामंडळाकडे नव्या बससाठी सातत्याने मागणी लावून धरली होती. आगाराकडून प्रशासनाकडे एकूण १० नव्या बसची मागणी करण्यात आली होती, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ५ बस प्राप्त झाल्या आहेत. त्यांच्या या यशस्वी पाठपुराव्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नव्याने दाखल झालेल्या या 'राजमाता जिजाऊ' बस प्रवाशांसाठी अधिक सोयीस्कर आहेत. यापूर्वी आगारात उपलब्ध असलेल्या गाड्या २ बाय २ आसन क्षमतेच्या आणि ४४ सीटर होत्या. मात्र, आता आलेल्या नव्या बस या ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या असून त्यांची क्षमता ५५ सीटर इतकी आहे. एका बाजूला तीन आणि दुसऱ्या बाजूला दोन आसने असल्याने एकाच वेळी अधिक प्रवाशांना प्रवास करता येईल. या सर्व नव्या बस केवळ ग्रामीण भागातच चालवल्या जाणार असल्याने खेड्यापाड्यातील जनतेला मोठा दिलासा मिळाला असून त्यांचा पुढील प्रवास आता अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# गुरुकृपा ची सातत्यपूर्ण यशस्वी निकालाची परंपरा कायम. आयुर्वेद महाविद्यालयाचा 94.33% निकाल



**माजलगाव :-** परमपूज्य गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, माजलगाव (जि. बीड) येथील प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. (Batch 2024-25) चा निकाल ९४.३३ टक्के लागला असून महाविद्यालयाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये कु. प्राजक्ता संतोष माने यांनी ७१ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. सायली बाळासाहेब मुंडे यांनी ६९.४१ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. तेजल नितीन घाडगे यांनी ६९.११ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थिनींचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, वैद्यकीय संचालक, प्राचार्या व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# किल्ले धारूर बस डेपो येथे उत्साहात वृक्षारोपण; 'पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज' असल्याचा संदेश!

## नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव आणि आगार प्रमुख मुळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रम संपन्न

**किल्ले धारूर (प्रतिनिधी) :** वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी किल्ले धारूर बस डेपो येथे आज एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले. दिनांक १४ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता डेपो परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. "झाडे लावूया, झाडे जगवूया... पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज आहे" हा संदेश देत या मोहिमेचा शुभारंभ अत्यंत उत्साहात पार पडला.



**मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटन सोहळा:**

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते श्री. मुळे साहेब आगार प्रमुख, किल्ले धारूर डेपो श्री. बाळासाहेब जाधव नगराध्यक्ष, धारूर नगरी श्री. चिकसी सर आदर्श शिक्षक आगारातील सर्व सन्माननीय कर्मचारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी.

यावेळी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि स्थानिक नागरिकांच्या हस्ते डेपो परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

**अनोखा सत्कार आणि पर्यावरण पूरक संदेश:**

कार्यक्रमाचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, येथे येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत नेहमीच्या पुष्पगुच्छांऐवजी 'एक वृक्ष भेट' देऊन करण्यात आले. सत्कारमूर्तींना रोपटे प्रदान करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या अनोख्या सत्काराने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

झाडे केवळ लावू नयेत, तर त्यांचे संगोपन करून ती जगवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असा सूर याप्रसंगी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

एस.टी. महामंडळाच्या वतीने राबवण्यात आलेल्या या सुंदर आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे धारूरकरांकडून भरभरून कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कष्ट घेणाऱ्या सर्व आयोजकांचे शेवटी मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला अंबाजोगाईतील सजग नागरिकांचा पाठिंबा

## केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी



**अंबाजोगाई :** नीट (NEET-UG) २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध पर्यावरणवादी नेते तथा सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाला अंबाजोगाईतील सजग नागरिकांनी पाठिंबा दर्शविला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदन देण्यात आले असून, नीट परीक्षेतील कथित गैरप्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट (NEET-UG) परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणाच्या निषेधार्थ अभिजित दिपके यांच्या पुढाकाराने देशव्यापी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून सोनम वांगचुक यांनी जंतर-मंतर येथे बेमुदत उपोषण सुरू केले असून, त्यांच्या उपोषणाचा १६ वा दिवस सुरू आहे. सलग उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली असतानाही केंद्र सरकारने अद्याप या आंदोलनाची गंभीर दखल घेतलेली नाही, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त संत वामनभाऊ महाराज व संत मदन महाराज दिंडीतील वारकऱ्यांना मोफत अपघात विमा

## भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचा सामाजिक उपक्रम; स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कडा यांच्या सहकार्याने पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा लाभ

**बीड, प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस तसेच लोकप्रिय नेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. शंकर देशमुख यांच्या वतीने वारकरी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कडा यांच्या सहकार्याने पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेअंतर्गत पंढरपूरच्या वारीसाठी पायी जाणाऱ्या वारकरी बांधवांचा एक वर्षाचा अपघात विमा पूर्णपणे मोफत काढून दिला जाणार आहे. या विम्याचा संपूर्ण प्रीमियम श्री. शंकर देशमुख स्वतः भरणार आहेत.

आषाढी वारीनिमित्त श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे ह.भ.प. संत वामनभाऊ महाराज यांची दिंडी दि. १४ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली (ता. पाटोदा) येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून, दि. १५ जुलै २०२६ रोजी श्री संत मदन महाराज संस्थान, कडा येथूनही दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. या दोन्ही दिंड्यांमध्ये हजारो वारकरी पायी सहभागी होत असतात. दिंडीचा मार्ग अनेक ठिकाणी राष्ट्रीय व राज्य महामार्गालगत असल्याने अपघाताचा धोका लक्षात घेऊन वारकरी बांधवांना आर्थिक सुरक्षा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली पंतप्रधान सुरक्षा विमा योजना ही सर्वसामान्यांसाठी अत्यंत उपयुक्त योजना आहे. या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू अथवा पूर्ण कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ₹२ लाख, तर अंशतः कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ₹१ लाखांचे विमा संरक्षण मिळते. वारीदरम्यान कोणतीही अनपेक्षित दुर्घटना घडल्यास वारकरी बांधव व त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा, हीच या उपक्रमामागील भावना असल्याचे श्री. शंकर देशमुख यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी १४ जुलै रोजी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली येथे तसेच १५ जुलै रोजी श्री संत मदन महाराज संस्थान, कडा येथे विशेष नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकरी बांधवाने आपल्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत किंवा बँक खाते क्रमांक सोबत आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी श्री. शंकर देशमुख म्हणाले, "मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि लोकनेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्य करण्याचा संकल्प केला आहे. वारकरी ही महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा असून त्यांची सुरक्षितता ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक वारकरी बांधवाने या मोफत विमा योजनेचा लाभ घ्यावा आणि सुरक्षित व आनंदी वारी करावी."

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणारा हा उपक्रम वारकरी सेवेला समर्पित असून, वारकरी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण सामाजिक पाऊल मानले जात आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी २८ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ जुलै : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज आणि तत्सम १२ पोटजातींमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सन २०२६ मध्ये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी २८ जुलै २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. मातंग, मांग, मिनी मादीग, मादींगा, दानखणी मांग, महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी आणि मादिगा या १२ पोटजातींमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

या शिष्यवृत्तीसाठी सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेले आणि सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेले इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पात्र असतील. अर्जदार विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमात सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असणे आवश्यक असून, निधीच्या उपलब्धतेनुसार गुणानुक्रमे ३ ते ५ विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाईल. इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, सन २०२६ ची गुणपत्रिका आणि पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसह दोन पासपोर्ट साईज फोटो जोडून आपले अर्ज डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, डाल्डा फॅक्ट्री, शिवनेरी गेट समोर, लातूर येथील महामंडळाच्या कार्यालयात २८ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.



## विविध वृत्त....

### १५ ते ३० जुलै दरम्यान शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ जुलै : शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १५ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाची मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिले. विशेषतः शाळाबाह्य राहणाऱ्या बालकांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

शाळाबाह्य बालकांच्या सर्वे क्षणा संदर्भाने जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच झाली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा सदस्य सचिव प्रमोद पवार, महिला व बालविकास अधिकारी शेख जे. एस., 'डाएट'चे प्राचार्य मारुती सलगर उपस्थित होते.

### वैद्यकीय प्रतिनिधींची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि .१४ जुलै : वैद्यकीय प्रतिनिधी लातूर युनिट ची वार्षिक सर्वसाधारण सभा पत्रकार भवन येथे नुकतीच संपन्न झाली

या कार्यक्रमा साठी प्रमुख पाहुणे म्हणून महासचिव कॉ . श्रीकांत फोपसे, कॉ . मिलिंद वझरकर, कॉ . मोहन पाटील उपस्थित होते .

यावेळी युनिट सचिव तसेच खजिनदारांचा अहवाल सादर करण्यात आल्यानंतर तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला . या सभेत नवीन कार्यकारीणी निवडण्यात आली . युनिट सचिव - कॉ . सिद्राम पाथरकर, खजिनदार - कॉ . उपेंद्र मोहळकर, जॉईंट सचिव आणि सी एससी कॉ . रामेश्र्वर देवणे, कॉ . मारोती अंधेवार, कॉ . चांद शेख, कॉ . कासीम पटेल, कॉ . सूर्यकांत बिराजदार, कॉ . विठ्ठल कलि टले, कॉ . नागेश पुणे पाटील, कॉ . ऋषीकेश घोडके, कॉ . आकाश जाधव, कॉ . अनिल काळे, कॉ . माऊली अडसूळ, कॉ . पापालाल पाटिल, कॉ . वैभव आचवले, कॉ . भारत बेतलाळे

## खासदार-आमदारांच्या जनता दरबारात शेकडो तक्रारींचा निपटारा

### खा. ओमप्रकाश राजे निंबाळकर, आ. अभिमन्यू पवार यांचा संयुक्त जनता दरबार

तभा वृत्तसेवा

औसा दि.१४ जुलै : तालुक्यातील नागरिकांच्या विविध समस्या ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या उद्देशाने औसा येथे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. विविध विभागांशी संबंधित शेकडो तक्रारींची सुनावणी करून अनेक प्रकरणांचा संबंधित विभागांकडून जागेवरच निपटारा करण्यात आला. उर्वरित तक्रारी तातडीने निकाली काढण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले.



औसा तालुक्यातील जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी का. ओमप्रकाश राजे निंबाळकर व आ. अभिमन्यू पवार यांचा संयुक्त जनता दरबार झाला. या जनता दरबारात औसा तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. रस्ते, महावितरण, महसूल, अतिक्रमण, पाणीपुरवठा, ग्रामविकास, सामाजिक न्याय आदी विभागांशी संबंधित प्रश्न्न नागरिकांनी मांडले. अनेक तक्रारींवर जागेवर निर्णय घेण्यात आला, तर उर्वरित प्रकरणे निश्र्चित कालमर्यादेत निकाली काढून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

यावेळी खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी प्रशासनाने सर्वसामान्यांच्या कामांना प्राधान्य द्यावे, नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी अधिकार्यानी जबाबदारीने काम करावे, असे निर्देश दिले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्यावर भर देतानाच नागरिकांनी अनावश्यक सामाजिक खर्च टाळून गावातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच मतदारसंघातील विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे सांगितले. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, शिक्षण आणि इतर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असा विश्र्वास खा. ओमप्रकाश राजे निंबाळकर त्यांनी व्यक्त केला.

आमदार अभिमन्यू पवार यांनी विकासकामांबाबत लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. शासकीय रस्ते किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांकडून नियमानुसार नुकसानभरपाईची वसुली करण्यात यावी, तसेच विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट करत अधिकाऱ्यांना वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या, यावेळी उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, भाजपाचे संतोष मुक्ता, संतोष सोमवंशी, सुभाष जाधव आदीसह जनता दरबाराला विविध शासकीय विभागांचे अधिकारी, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नवतंत्रज्ञानाचा प्रसार व प्रशिक्षणातून दुग्ध उत्पादनात वाढ शक्य : जिल्हाधिकारी



तभा वृत्तसेवा

लातूर दि.१४ जुलै : दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी पशुपालकांपर्यंत नवतंत्रज्ञान पोहोचविणारे विस्तार शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान, पशुसंवर्धन विभाग आणि एमएसडी पशु आरोग्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'भविष्योन्मुख पशुवैद्यकीय सेवा : उदयोन्मुख तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रगती आणि शाश्र्वत पशुधन आरोग्य' या विषयावर पशुवैद्यकांसाठी विभागीय तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. नानासाहेब सोनवणे, ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर बिडवई, वनामकृविचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, ज्येष्ठ पशुवैद्यक शास्त्रज्ञ तथा माफसूचे माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा. डॉ. अनिल भिकाने, राष्ट्रीय तांत्रिक अधिकारी (एमएसडी) व पशुप्रजनन तज्ज्ञ डॉ. उमेश कुंभार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, डॉ. सखाराम खुणे, डॉ. आर. डी. कदम, कार्याध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे व सचिव डॉ. रवींद्र डावरे उपस्थित होते.

चर्चासत्रात प्रा. डॉ. अनिल भिकाने म्हणाले की, प्रतिजैविक प्रतिरोधकता ही पशुवैद्यकीय व मानवी आरोग्यासमोरील अत्यंत गंभीर जागतिक समस्या बनली आहे. जिवाणूजन्य आजारांवरील उपचार टाळणे हा यावर उपाय नसून, प्रतिजैविकांचा जबाबदारीने, वैज्ञानिक पद्धतीने, अचूक निदानाच्या आधारे आणि केवळ आवश्यकतेनुसारच वापर करणे गरजेचे आहे. उपचारप्रधान पशुवैद्यकीय सेवेकडून आता प्रतिबंधात्मक व पूर्वानुमानाधारित पशुवैद्यकीय सेवेकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. भविष्यातील पशुवैद्यक हा केवळ उपचार करणारा चिकित्सक न राहता कळप आरोग्य तज्ज्ञ, रोगसाथशास्त्रज्ञ, अन्नसुरक्षा तज्ज्ञ आणि 'वन हेल्थ' तत्त्वज्ञानाचा प्रभावी समन्वयक म्हणून बहुआयामी भूमिका पार पाडेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावून चा ४३ वा पदग्रहण सोहळा संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ जुलै : रोटरी ही सेवाभावी संस्था असून जगभरातील २२० पेक्षा अधिक देशात ४६०० क्लबच्या माध्यमातून १.२ मिलियन रोटरीन आपली सेवा व समर्पण देत असतात .लातूर येथील ४२ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावून चा ४३ वा पदग्रहण सोहळा रोटरी डिस्ट्रीक्टचे प्रांतपाल इलेक्ट क्षितीज झावरे व उपप्रांतपाल नागनाथ आगवाणे यांचे उपस्थितीत पार पडला. चालू वर्षाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक रमेश चिल्ले तर सचिव म्हणून उद्योजक उमेश पत्रावळे यांनी मावळते अध्यक्ष अमोल दाडगे व सचिव पवन मालपानी यांचेकडून पदभार स्वीकारला .




यावेळी मिडटावून चे सहयोगि क्लब रोटरी क्लब ऑफ सॅटॅलाइट अध्यक्ष सुप्रिया दाडगे व स्वाती बादाडे तसेच रोटरॅक्ट क्लब ऑफ मिडटावून च्या अध्यक्ष तनिक्षा बोरा सचिव यश बांगर व शौनक सांगवीकर यांनी पदभार स्वीकारला. तसेच इंटरॅक्ट क्लबचे ही पदग्रहण संपन्न झाले.

रोटरी क्लबच्या वतीने शहरात गेली सात वर्षांपासून निराधार ५० ज्येष्ठ नागरिकांना दोन वेळा मोफत घरपोच डबा पुरवला जातो. तसेच कॅन्सर डिटेक्शन व मोफत नेत्र तपासणी व ऑपरेशन साठी अद्ययावत व्हॅनची सुविधा सुविधा करण्यात आली आहे .या व्हॅन ग्रामीण भागातील गरजूंची तपासणी करतात व सुविधा पुरवतात. तसेच ब्लड डोनेशन, शेतकऱ्यांसाठी शेती अवजारे बँक, शाळेतील मुलांना वॉटर कुलर, आरोग्य तपासणी, वृक्ष लागवड, सेंद्रिय शेती ,गट शेती बाबतही मदत केली जाते. अशा सेवेसाठी रोटरी ची समाजात खूप चांगली प्रतिमा असून राजकारण व जातपात विरहित व्यवसायिक, डॉक्टर्स, प्राध्यापक मंडळी एकत्र येऊन यात कार्य करीत असतात .

भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या पदग्रहण सोहळ्यात रोटरीचे माजी प्रांतपाल विजय भाऊ राठी मागील वर्षाचे प्रांतपाल सुधीर लातूरे, डॉक्टर सोपानराव जटाळ, अड.उदय गवारे, माधवराव पाटील टाकळीकर, शरद झरे, कवी नरसिंग इंगळे ,वेगवेगळ्या क्लब ची अध्यक्ष, सचिव, समाजातील मान्यवर व रोटरियन कुटुंबीयसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे टीम लीडर शिरीष उटगे तसेच शशिकांत मोरलावार ,लितेश शहा ,अजय दुडले ,अनिल पाटील ,विशाल आयाचित ,वीरेंद्र पुंडीपल्ले, प्रशांत भाटगावे ,जयप्रकाश सोनी ,मोतीलाल वर्मा श्रद्धांनंद अपशेट्टी, रवींद्र बनकर, किशोर दाताळ, गिरीश पेन्सलवार , संगीता लातूरे व अनेक सदस्याने खूप मेहनत घेऊन हा कार्यक्रम संपन्न केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर राजगोपाल तापडिया व ओमप्रकाश झुरळे यांनी केले.

### सात दिवसात २ कोटींची कर वसुली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ जुलै : व्याजावर १०० टक्के सवलत योजनेचा लाभ मालमत्ताधारक घेत असल्यामुळे मनपाकडे एका आठवड्यात २ कोटी वसूल झाले आहेत.

## आषाढी वारीनिमित्त आयोजित 'चरण सेवा' उपक्रमात लातूर येथे २५० पेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जुलै : मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय आणि लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त 'चरण सेवा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १२ आणि १३ जुलै २०२६ रोजी लातूर येथील श्री सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर मंदिर येथे झालेल्या या उपक्रमात २५० पेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी व मोफत उपचार करण्यात आले.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सद्गुरु श्री गुंडा महाराज संस्थानच्या दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे. या दिंडीसोबत शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात. वारकऱ्यांच्या या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्र्वर नाईक यांच्या नेतृत्वामध्ये राज्यभर 'चरण सेवा' उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात सुमारे ६० वैद्यकीय व निमवैद्यकीय तज्ज्ञांच्या चमूने २५० हून अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, चरण सेवा व औषधोपचार उपलब्ध करून दिले. वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातर्फे वारकऱ्यांना आयुष उपचार पद्धतीद्वारे आवश्यकतेनुसार उपचार करण्यात आले. तसेच लातूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वैद्यकीय चमुमार्फत रुग्णांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधी देण्यात आली. या प्रसंगी संस्कार भारतीच्या चमूकडून काढण्यात आलेली आकर्षक रांगोळी आणि फुलांची सजावट सर्वांचे मुख्य आकर्षण ठरली होती.



सद्गुरु श्री गुंडा महाराज संस्थानचे दिंडी प्रमुख श्री गुरुराज महाराज यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, यामुळे वारकऱ्यांना मोठा फायदा होत असल्याचे सांगितले. हा स्तुत्य उपक्रम यशस्वी करण्यासाठी वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. विकास निलंगेकर व डॉ. सुनीता निलंगेकर आणि त्यांची टीम, आरोग्य विभाग लातूर शहर महानगरपालिका, संस्कार भारती संस्था, तसेच इतर सर्व सेवेकरी व स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

## सहकार महर्षी स्व. रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या पुण्यस्मरणार्थ रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १४ जुलै : शिक्षण तथा सहकार क्षेत्रातील दूरदृष्टीचे नेतृत्व, लोकजागृती शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान तथा सहकार महर्षी स्वर्गीय रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या ९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त रविवारी (दि. १२ जुलै) देवणी येथील विवेक संकुलात आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या शिबिरात ७५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून गरजू रुग्णांच्या जीवनरक्षणासाठी मोलाचे योगदान दिले. समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




कार्यक्रमाच्या प्रारंभी सहकार महर्षी स्व. रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या शिक्षण, सहकार आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत, त्यांच्या विचारांचा वारसा समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

सध्या विविध शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असून अपघातग्रस्त रुग्ण, थॅलेसेमियाग्रस्त बालके, गरोदर माता तसेच मोठ्या शस्त्रक्रिया होणाऱ्या रुग्णांसाठी रक्ताची नितांत आवश्यकता असते. ही सामाजिक गरज लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात युवकांसह विविध वयोगटातील रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रत्येक रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात, या भावनेतून रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेची अनोखी सेवा बजावली.

यावेळी लोकजागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आण्णाराव पाटील, सचिव भगवानराव पाटील तळेगावकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सदाशिवराव पाटील तळेगावकर, नगरसेवक किशोर निडवंचे, पंचायत समितीचे माजी सभापती शंकरराव पाटील तळेगावकर, नागेश जिवणे, मनोहर पटणे, पोलीस पाटील संभाजी पाटील, डॉ. विलास गरड, देवणी चेअरमन विजयकुमार लुल्ले, उदगीर नगरपालिकेचे बांधकाम सभापती शहाजी पाटील, प्राचार्य बसवराज पाटील, उपप्राचार्य चंद्रशेखर काळे, मुख्याध्यापक विनायकराव पाटील बटनपूरकर तसेच विवेक संकुलातील सर्व शिक्षक, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, रक्तदाते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या ७५ रक्तदात्यांचा आयोजकांच्या वतीने गौरव करण्यात आला.

### तलाठ्याने परस्पर जमीन केली दुसऱ्याच्या नावे

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१४ जुलै : लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ येथील शेतकरी राहुल व्यंजने यांनी तलाठ्याच्या त्रासाला कंटाळून तलाठ्याच्या विरोधात बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले आ-हे. तलाठ्याने परस्पर दुसऱ्याच्या नावे जमीन केल्याचे हे प्रकरण आहे.

शेतकरी राहुल व्यंजने यांची वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणी नंतर तलाठ्याने परस्पर शेतजमिनीचा कांही भाग एका सावकारच्या नावे फेरफार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकारणी संबंधित तलाठ्याच्या विरोधात पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे तर चौकशी समितीनेदेखील तलाठ्याला दोषी ठरवले आहे.

मात्र संबंधित तलाठ्यावर कोणतीही कारवाई होत नाही. उलट तलाठ्याकडून त्रास दिला जात आहे. त्यामुळे राहूल व्यंजने यांनी तलाठ्याच्या विरोधात येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लागले आहे. बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

ऐकू कमी येणाऱ्यांसाठी

कानाचे मशिन रु. ४९९९/- ते रु. १३९९९ पर्यंत

आतील न दिसणारे लहान मशिन रु. ६९९९/- मध्ये उपलब्ध



श्री स्वामी समर्थ मार्केटिंग संपर्क: मो. 9822855682 / 9270653732

# मराठवाड्यात विकासाची मोठी सुप्तशक्ती : ज्येष्ठ विचारवंत माधव भंडारी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १४ जुलै -**

मराठवाड्याच्या विकासास डॉ. शंकरराव चव्हाण यांनी दिलेल्या योगदानामुळे मराठवाड्याची स्थिती भीषण होण्यापासून वाचली. सिंचनाशिवाय मराठवाड्यातील शेतीच्या विकासाची शक्यता नव्हती, हे ते जाणून होते. त्यांच्या संकल्पनेतूनच जायकवाडी, विष्णुपुरी हे प्रकल्प पूर्ण झाले. मराठवाड्याकडे सुपीक जमीन, उपलब्ध जलसंपदा, कुशल मनुष्यबळ, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि पर्यटनाची मोठी क्षमता आहे. कृषी, कृषी प्रक्रिया उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान आणि वारसा पर्यटन यांची प्रभावी सांगड घातल्यास मराठवाडा हा महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' ठरू शकतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) माधव भंडारी यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा'च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'मराठवाडा : काल, आज व उद्या' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण, डॉ. प्रशांत पेशकार आणि नारायण चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या व्याख्यानात माधव भंडारी यांनी मराठवाड्याच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासाचा वेध घेत भविष्यातील विकासाच्या संधींवर सखोल विवेचन केले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील त्यांच्या नेतृत्वासोबतच सामाजिक समतेसाठीच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला.

माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे जायकवाडी आणि विष्णुपुरीसारखे महत्त्वाचे सिंचन प्रकल्प साकार झाले आणि मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली, असे त्यांनी सांगितले. मराठवाड्याचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीचा असून तेर आणि भोगवर्धन ही प्राचीन व्यापारी केंद्रे ग्रीस व रोमपर्यंत



व्यापार करत होती. कापूस, वस्त्रनिर्मिती, काच वस्तू, मणी, रंगद्रव्ये तसेच कृषी प्रक्रिया उत्पादनांच्या निर्यातीचे पुरातत्त्वीय पुरावे उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील बारवांसारख्या पारंपरिक जलव्यवस्थापन पद्धतींचा उल्लेख करत त्यांनी जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केले. यादव राजवटीत मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या विकासाला मोठी चालना मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. रोजगाराच्या शोधात मराठवाड्यातील युवक मोठ्या शहरांकडे स्थलांतर करत असले तरी आगामी दशकात सुशिक्षित युवक पुन्हा शेतीकडे वळतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी शेतीला प्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेशी जोडण्याची गरज अधोरेखित केली. केळी, कापूस, कडधान्ये, तेलबिया यांसारख्या पिकांवर आधारित उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पर्यटन क्षेत्रातील संधींबाबत बोलताना त्यांनी रेणुकामाता, अंबाजोगाई, तुळजाभवानी, औंढा नागनाथ, देवगिरी किल्ला तसेच मराठवाड्यातील ऐतिहासिक किल्ले, मंदिरे आणि सांस्कृतिक वारसा यांचे प्रभावी संवर्धन व विपणन केल्यास हा प्रदेश देश-विदेशातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरू शकतो, असे मत व्यक्त केले.

व्याख्यानाचा समारोप करताना त्यांनी, इतिहास विसरून चालत नाही. इतिहास, जलसंपदा, शेती, तंत्रज्ञान आणि उद्योजकता यांच्या बळावर मराठवाड्याचा उज्ज्वल भविष्यकाळ घडविता येईल, असा आशावाद व्यक्त केला.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, जोपर्यंत मराठवाड्यात पाणी वाहत राहील, तोपर्यंत या प्रदेशाला डॉ. शंकरराव चव्हाण यांची आठवण होत राहील. विष्णुपुरी धरण आणि जायकवाडीसारखे सिंचन प्रकल्प हे त्यांच्या दूरदृष्टीचे जिवंत स्मारक असून मराठवाड्याच्या विकासाच्या वाटचालीतील मैलाचे दगड आहेत.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छायाचित्रकार विजय होकर्णे निर्मित डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावरील 'गोदाकाठचा महान कर्मयोगी' माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ आणि डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी प्रमुख वक्ते माधव भंडारी यांचा परिचय करून दिला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण यांनी डॉ. शंकरराव चव्हाण यांच्याशी संबंधित आठवणींना उजाळा देत त्यांच्या विकासदृष्टीचा गौरव केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्राचे समन्वयक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोरडा दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी एक लाख अनुदान द्या

**नांदेड** -कोरडा दुष्काळ जाहीर करा, चारा छावण्यांचे नियोजन करा, वीस दिवसांच्या पावसाच्या खंडाची नोंद घ्या, शेतकर्यांना हेक्टरी एक लाख अनुदान द्या आणि प्रधानमंत्री हवामान आधारित पीकविमा हळदीच्या विम्यास ३० जुलैपर्यंत मुदतवाढ द्या आदी मागण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे यांनी पाठविले आहे. सोनखेड, शेवडी मंडळ, लोहासह नांदेड जिल्ह्यामध्ये २० दिवसांचा पावसाचा खंड पडला असून त्यामुळे ज्वारी, सोयाबीन, हळद, कापूस काही ठिकाणी दुबार पेरणीची वेळ आली आहे, तर काही ठिकाणी पाण्याअभावी जमिनीच्या बाहेर निघत नाही. काही खडकाळ जमिनीमध्ये सोयाबीन निघाली नसून दुबार पेरणीची वेळ शेतकर्यांवर आली आहे. १४ जुलैपर्यंत पावसाची सरासरीच्या ५० टक्के तूट निर्माण झाली आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व चार्याचा प्रश्न निर्माण होत आहे. जनावरांसाठी पाणी व चारा छावणी उभारणीचे नियोजन शासनाने करावे. ऑटोमॅटिक हवामान केंद्र व हवामान विभागाच्या अहवालाचा आधार घेऊन सामूहिक पंचनामे करून प्रधानमंत्री पीक विमा योजना व प्रधानमंत्री हवामान आधारित फळपीक योजना अंतर्गत पावसाचा खंड ग्राह्य धरून कोरडा दुष्काळ जाहीर करून नुकसान भरपाई देण्याचे आदेश द्यावेत. जागतिकीकरणाच्या काळामध्ये हवामानाच्या बदलामुळे भारतीय शेतकर्याला झटका आणि फटका बसत आहे. तरी कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकर्यांना एक लाख रुपये अनुदान द्यावे, जनावरांसाठी चारा छावण्यांचे नियोजन करावे, प्रधानमंत्री पीकविमा योजना व प्रधानमंत्री हवामान आधारित फळपीक योजना यामधील जोखमीचा आधार घेऊन पावसाचा खंड अंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करून शेतकर्यांना मदत करावी, अशी मागणीही मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## नांदेडमध्ये निराळी समाजाचा राज्यस्तरीय भव्य उपवधू-वर परिचय मेळावा

**नांदेड**-निराळी समाजातील विवाहोत्सुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा, समाजातील वैवाहिक संबंध अधिक दृढ व्हावेत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विवाह जुळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, या उद्देशाने निराळी समाज सेवा प्रतिष्ठान, नांदेड यांच्या वतीने राज्यस्तरीय भव्य उपवधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा बहुप्रतिक्षित मेळावा रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी वामनराव पावडे मंगल कार्यालय, पूर्णा रोड, नांदेड येथे उत्साहात संपन्न होणार आहे.या मेळाव्यात महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि गुजरात या राज्यांतील निराळी समाजातील विवाहोत्सुक युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, समाजातील कुटुंबांना एकमेकांशी परिचय करून देण्यासाठी हे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. समाजातील युवक-युवतींचे विवाह योग्य वेळेत आणि योग्य पद्धतीने जुळावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.मेळाव्यासाठी विवाहोत्सुक युवक-युवतींची नोंदणी सुरू झाली असून, पालकांनी आपल्या पाल्यांचा बायोडाटा समितीने उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्मद्वारे तातडीने भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये बायोडाटा भरता येणार असल्याने राज्याबाहेरील समाजबांधवांनाही सहभाग घेणे सोयीचे होणार आहे. उपवधूंचे बायोडाटा व देणगीसंदर्भातील माहितीसाठी चंद्रकांत कळसकर (मो. ९८६०३२६९४२), उपवरांच्या नोंदणीसाठी मो. ९०२१२७७७६९, तर देणगीसाठी पांडुरंग गज्जेवार (मो. ९४२३४४१७०८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गुगल फॉर्म भरण्यात अडचण आल्यास संबंधित गाव किंवा शहरातील मेळावा समन्वयक आवश्यक मार्गदर्शन करतील, असेही प्रतिष्ठानतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक कुटुंबाने या मेळाव्यात सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या विवाहोत्सुक मुला-मुलींची नोंदणी करावी. हा मेळावा केवळ वधू-वर परिचयाचा कार्यक्रम नसून समाजातील ऐक्य, परस्पर संवाद आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणारा उपक्रम ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी विनायक कळसकर, मोहन कुरुडे, नारायण पारेकर, चंद्रकांत दामेकर, पांडुरंग गज्जेवार, प्रभाकर पारेकर, बालाजी भांगे, संजय गरुडकर, श्याम एमेकर, उमेश गरुडकर, चंद्रकांत कळसकर आणि रामकिशन इंदुरकर यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.समाजातील सर्व बांधवांनी या राज्यस्तरीय उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन निराळी समाज सेवा प्रतिष्ठान, नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

## विद्यापीठात 'गोदाकाठचा महान कर्मयोगी' माहितीपटाचे प्रदर्शन

**नांदेड** -महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, भारताचे माजी गृहमंत्री, मराठवाड्याचे भाग्यविधाते आणि महाराष्ट्रात जलक्रांती घडवून कृषी विकासाला नवी दिशा देणारे डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त छायाचित्रकार विजय होकर्णे निर्मित 'गोदाकाठचा महान कर्मयोगी' या माहितीपटाचे प्रदर्शन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये दि: १४ जुलै, २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, 'मराठवाडा : आज, काल आणि उद्या' या विषयावरील व्याख्यानासाठी उपस्थित असलेले ज्येष्ठ विचारवंत माधव भंडारी, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा व्यवस्थापण परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ प्रशांत पेशकार, नारायण चौधरी जनसंपर्क अधिकारी अशोक कदम, डॉ. दिलीप चव्हाण तसेच विद्यापीठातील विभागप्रमुख उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेतील सर्व पत्रव्यवहार आता ई-ऑफिसमधूनच; महेश पाटील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ जुलै -**

जिल्हा परिषद नांदेडमध्ये प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि पेपरलेस करण्याच्या उद्देशाने सर्व विभागांनी आता ई-ऑफिस प्रणालीद्वारेच फाईल व टपाल व्यवहार करावेत, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी केले आहे.



या अनुषंगाने जिल्हा परिषद आस्थापनेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शासकीय ई-मेल आयडी तयार करण्यात आले असून, यापुढे कार्यालयीन पत्रव्यवहार, टपाल तसेच फाईलची देवाण-घेवाण ई-ऑफिस प्रणालीद्वारे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ई-ऑफिस प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या गट 'क' संवर्गातील एकूण ८८१ कर्मचाऱ्यांपैकी ७७२ जणांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच आतापर्यंत ५६ हजारांहून अधिक ई-फाईल्स तयार करण्यात आल्या असून ५२ हजार ४२१ टपालांचा ई-ऑफिसद्वारे व्यवहार करण्यात आला आहे.

ई-ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा कार्यक्रम प्रमुख कुलदीप जोशी समन्वयाची जबाबदारी सांभाळत आहेत. तर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनीही सर्व विभागप्रमुख व अधिकाऱ्यांना टपाल व पत्रव्यवहार ई-ऑफिसद्वारेच करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ई-ऑफिस प्रणालीमुळे कागदाचा वापर आणि छपाईचा खर्च कमी होण्यास मदत होत असून कार्यालयीन कामकाजाला गती मिळत आहे. फाईल कोणाकडे किती दिवस प्रलंबित आहे, याचा ऑनलाइन मागोवा घेता येत असल्याने पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढत आहे. तसेच डिजिटल स्वरूपात कागदपत्रे सुरक्षित राहणे, जुन्या फाईल्स सहज शोधता येणे, डिजिटल स्वाक्षरीद्वारे मंजुरी देणे आणि आवश्यकतेनुसार दूरस्थ पद्धतीनेही कामकाज करणे शक्य होत आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेला वेग येऊन नागरिकांना अधिक जलद आणि कार्यक्षम सेवा उपलब्ध होण्यास मदत होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना ई-ऑफिसचा नियमित वापर करून गतिमान, पारदर्शक, उत्तरदायी आणि पेपरलेस प्रशासन साकार करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे.

# थेरबन ग्रामपंचायतीत झालेल्या कथित अर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करा



**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १४ जुलै -**

तालूक्यातील मौजे थेरबन येथे २०२१ ते २०२५ या कालावधीमध्ये १५ व्या वित्त आयोग व जलजिवन मिशन अंतर्गत झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाची व अर्थीक गैरव्यवहार झालेल्या कामाची सखोल तांत्रीक,अर्थिक व प्रशासकिय चौकशी करुन दोषीवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी थेरबन येथील सेवानिवृत्त शिक्षक सूरेश मूपडे व पूरभा गंगाराम सूदेवाड यांनी भोकर पंचायत समोर दि.१४ जूलै पासून अमरण उपोषण सूरु केले आहे.उपरोक्त सदर्भात उपोषणकर्ते दि.०३ जूलै रोजी पंचायत समिती प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले होते.परंतू पंचायत समिती प्रशासनाकडून कोणतेही उत्तर देण्यात आले नाही.२०२१ ते २०२५ या कालावधीत झालेल्या सर्व कामाचे विशेष लेखापरिक्षण,मोजमाप पूस्तिका,मंजूरी,बिले,अभिलेख व प्रत्यक्ष स्थळपहाणी करुन चौकशी करण्यात यावी दोषी आढळणार्यावर कायदेशीर कारवाई करुन शासनाचे नूकसान वसूल करण्यात यावे. अशी मागणी करण्यात आली.निवेदनाच्या प्रती विभागीय आयूक्त संभाजीनगर उपमूख्यकार्यकारी जि.प.नांदेड आदिंना पाठविण्यात आल्या आहेत.

# महाटी आणि कौडगावच्या सेवा सहकारी सोसायटीचे ठराव वैध

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १४ जुलै -**

तालूक्यातील सेवा सहकारी संस्था महाटी आणि कौडगाव येथील संचालक किशनराव केरबा जाधव आणि अशोक आजराबर सूर्यवंशी यांचे विरोधात आक्षेप कर्ते अनुक्रमे सोपानराव नागोराव मोरे आणि श्रीमती सुमनबाई बाबुराव कदम यांनी विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांचेकडे आक्षेप दाखल केला होता परंतू त्यांनी ते आक्षेप फेटाळून लावले होते. त्या निर्णयाला संबंधितांनी संभाजीनगर चे उच्य न्यायालयात अपिल दाखल केले होते ते मंजूर करण्यात आल्यानंतर किशनराव केरबा जाधव (महाटी) आणि अशोक आजराबर सूर्यवंशी (कौडगाव) यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असता तेथे त्यांचे विषयी घेतल्या गेलेले ठराव वैध असल्याचा निकाल देण्यात आला. ह्या दोन्ही सेवा सहकारी संस्थाचे निकालामुळे उद्योजक मारोतराव कवळे गुरुजींचे उमरी तालूक्यातून पारडे जड झाले आहे.

सेवा सहकारी सोसायटी लि. सिंधी ता. उमरी येथील मारोतराव कवळे गुरुजींचे विरोधात संतोष बापुराव कवळे यांनी तर सालेगाव ता. धर्माबाद सेवा सहकारी संस्था येथून सौ. सागरबाई मारोतराव कवळे यांचे विरोधात पंडीतराव नरवाडे यांनी विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांचेकडे आक्षेप दाखल केला होता तो फेटाळण्यात आल्या नंतर विरोधकांनी उच्य न्यायालयात धाव घेतली होती परंतू तेथेही विरोधकांना यश आले नाही. मारोतराव कवळे गुरुजींचे विरोधात संतोष कवळे हे सर्वोच्च न्यायालया पर्यंत गेले होते परंतू तेथेही विरोधकांचा निभाव लागलेला नाही.

एकंदरीत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर ते सर्वोच्च न्यायालय दिल्ली पर्यंत प्रवास करूनही गोरठेकर गटाला यश न आल्यामुळे कवळे गुरुजींचे गटात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीसाठी

उमरी तालूक्यातून मारोतराव कवळे गुरुजी, धर्माबाद तालूक्यातून त्यांच्या पत्नी सौ. सागर बाई मारोतराव कवळे आणि हिमायतनगर तालूक्यातून गुरूजींचे व्याही माजी आमदार माधवराव जवळगावकर यांचेसाठी वातावरण अनुकूल असल्यामुळे गुरूजी समर्थक खुष आहेत.

## विशेष एसआयआर कॅम्पचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ जुलै -**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २ (तरोडा बु.) अंतर्गत येणाऱ्या चैतन्य नगर परिसरातील साईबाबा मंदिर प्रांगणात नुकताच एक विशेष एसआयआर कॅम्प आयोजित करण्यात आला. महापौर सौ. कविता संतोष मुळे यांच्या पुढाकाराने राबवण्यात आलेल्या या शिबिरामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, काम सुलभ झाले आहे.

या शिबिराला नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांनी भेट देऊन या शिबिराचे कौतुक केले.यावेळी उपजिल्हाधिकारी कोळीकर, मनपा उपायुक्त अजितपालसिंग संधू, मनपा उपायुक्त अभिजीत वायकोस आणि क्षेत्रीय अधिकारी नागनाथ पतंगे यांचा समावेश होता.

या विशेष कॅम्पच्या माध्यमातून नागरिकांना मतदान पुनर्निरक्षण अभियानात मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.महापौरांच्या या लोकहिताच्या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# रजा चौकातील प्रस्तावित पेट्रोल पंपाला विरोध

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ जुलै -**

रजा चौकातील बरकत कॉम्प्लेक्स परिसरातील वर्दळीच्या जंक्शन पॉईंटवर प्रस्तावित सय्यद अरशद अली यांच्या आयओएल पेट्रोल पंपाला राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने विरोध दर्शविला आहे. पेट्रोलियम अधिनियम १९३४, पेट्रोलियम नियम २००२ तसेच लागू रस्ते सुरक्षा निकषांचे पालन न करता पेट्रोल पंपाला एनओसी अथवा अंतिम मंजुरी देऊ नये, अशी मागणी जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना निवेदनाद्वारे केली आहे.

प्रस्तावित जागा जंक्शन पॉईंटपासून अवघ्या १० मीटर अंतरावर असून नियमानुसार आवश्यक अंतर उपलब्ध नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जागेलगत निवासी घरे असून स्थानिक रहिवाशांनीही पेट्रोल पंपाला आक्षेप नोंदविला आहे. परिसरातील वाहनांची व विद्यार्थ्यांची वर्दळ, वाहतूक कोंडी, अपघाताचा संभाव्य धोका तसेच लगतच्या हॉटेलच्या किचनमुळे अग्निसुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

नागरिकांचे आक्षेप आणि सुरक्षेचे गंभीर प्रश्न असतानाही प्रशासनाकडून एनओसीची प्रक्रिया पुढे नेली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रशासनाने नियम व सार्वजनिक सुरक्षेचा विचार करून एनओसी प्रक्रिया तात्काळ थांबवावी; अन्यथा तीव्र आंदोलन करून न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा फैसल सिद्दीकी यांनी दिला आहे.

# रखडलेला पीकविमा अन् पावसाची दडी; बळीराजा दुहेरी संकटाच्या विळख्यात

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १४ जुलै -**

एकीकडे गेल्या वर्षीच्या पीकविम्याची रक्कम अद्याप मिळालेली नाही, तर दुसरीकडे यंदा पेरणीनंतरच पावसाने दडी मारली आहे. या दुहेरी संकटामुळे इस्लापूर परिसरातील बळीराजा अक्षरशः हवालदिल झाला आहे. नुकतीच उगवून आलेली सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आणि इतर खरीप पिके पावसाअभावी कोमेजू लागली असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आशेचे हास्य आता चिंतेत बदलले आहे.

इस्लापूर परिसरातील बहुतांश शेती ही पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. सिंचनाच्या मर्यादित सुविधा असल्यामुळे प्रत्येक खरीप हंगाम हा निसर्गाच्या भरोशावरच उभा असतो. यंदा रोहिणी आणि मृग नक्षत्राने अपेक्षाभंग केल्यानंतर आद्रा नक्षत्रात झालेल्या अल्प पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली.



सध्या परिसरात सुमारे ८५ टक्के खरीप पेरणी पूर्ण झाली आहे. मात्र, पेरणीनंतर गेल्या आठवडाभरापासून पावसाने अचानक पाठ फिरवल्याने शेतातील ओलावा झपाट्याने कमी होत आहे.

शेतामध्ये नुकतीच उगवलेली पिके जीवनाच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. या काळात सातत्याने पावसाची आवश्यकता असताना आभाळ कोरडे पडल्याने अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे. काही शेतांमध्ये रोपे पिवळी पडू लागली असून, परिस्थिती अशीच राहिल्यास दुबार पेरणीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यामध्ये सर्वाधिक वेदनादायक बाब म्हणजे गेल्या वर्षीच्या पीकविम्याची रक्कम अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. मागील हंगामातील नुकसानभरपाईची प्रतीक्षा कायम असतानाच यंदा पुन्हा पावसाने साथ सोडल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. एका संकटातून सावरण्यापूर्वीच दुसरे संकट समोर उभे ठाकल्याने ग्रामीण भागात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यंदा बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीच्या वाढलेल्या खर्चामुळे शेती करणे आधीच महाग झाले आहे. अशा परिस्थितीत पावसाची उघडीप कायम राहिली तर उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून, दुबार पेरणीचा अतिरिक्त आर्थिक भारही शेतकऱ्यांना सहन करावा लागू शकतो.

शेती हेच या भागातील हजारो कुटुंबांचे अर्थकारण आहे. शेतात उभे असलेले पीक म्हणजे केवळ हिरवे रोप नसून, वर्षभराच्या उदरनिर्वाहाची, मुलांच्या शिक्षणाची, कर्जफेडीची आणि कुटुंबाच्या भविष्याची आशा असते. आज तीच आशा पावसाअभावी कोमेजताना दिसत आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवस अत्यंत निर्णायक आहेत. या कालावधीत चांगला पाऊस झाला तर पिकांना नवसंजीवनी मिळू शकते. अन्यथा हजारो एकरांवरील खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

सध्या इस्लापूर परिसरातील प्रत्येक शेतकऱ्याची नजर आभाळाकडे लागली आहे. गेल्या वर्षीचा पीकविमा आणि यंदाचा पाऊस या दोन्हींची प्रतीक्षा आता बळीराजाला लागून राहिली आहे. कारण, या दोन्ही गोष्टींवरच हजारो शेतकरी कुटुंबांचे आर्थिक भवितव्य अवलंबून आहे.

# जि. प. मध्ये राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानांतर्गत विभागप्रमुखांचे प्रशिक्षण

## शाश्वत विकासाच्या नियोजनावर भर द्या- विवेक गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**

राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानांतर्गत पंचायत विकास आराखडा अधिक प्रभावीपणे आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार करण्यासाठी हिंगोली जिल्हा परिषदेच्या वतीने सोमवारी जिल्हास्तरीय विभागप्रमुखांचे एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड हे होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी पंचायत विकास आराखड्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले,

ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी 'पंचायत विकास आराखडा' हा पाया आहे. स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष गरजा आणि समस्या ओळखून जर आपण काटेकोर नियोजन केले, तरच उपलब्ध शासकीय निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर होईल. या प्रभावी नियोजनामुळेच ग्रामीण भागाच्या विकासाला खऱ्या अर्थाने अधिक गती मिळेल.

या महत्त्वाच्या प्रशिक्षण मध्ये प्रामुख्याने १५ जून २०२६ रोजीच्या नवीन शासन निर्णयानुसार तांत्रिक व धोरणात्मक विषयांवर सविस्तर चर्चा आणि मार्गदर्शन करण्यात आले. शाश्वत विकास ध्येये पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन विकास डोळ्यांसमोर ठेवून आराखडा कसा तयार करावा, हे समजावून सांगण्यात आले.

विविध योजनांचे अभिसरण वेगवेगळ्या योजनांची सांगड घालून एकाच कामासाठी जास्तीत जास्त संसाधने कशी उपलब्ध करता येतील, यावर चर्चा झाली.

१६ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर करताना कायदेशीर बाबी आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे बंधनकारक आहे, याची माहिती देण्यात आली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांना पंचायत विकास आराखड्याची पार्श्वभूमी समजावून सांगत प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. 'यशदा' चे प्रशिक्षक पट्टेबहादुर आणि मोहरील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सर्व विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोलीत १०० टक्के काम करणाऱ्या बीएलओंचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील मतदार पडताळणी, गणना पत्रक वितरण व डिजिटायझेशनची कामे शंभर टक्के पूर्ण करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात सत्कार करण्यात आला.

हिंगोली जिल्ह्यात दि. ३० जून २०२६ पासून विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहीम सुरू असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घराघरात जाऊन मतदारांची पडताळणी करत आहेत. या मोहिमेसाठी जिल्ह्यात एकूण १०१५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या कार्यास सहाय्य करण्यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत ३७ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

या विशेष मोहिमेदरम्यान मतदारांना गणना पत्रकांचे वितरण, प्राप्त गणना पत्रकांचे संकलन तसेच माहितीचे डिजिटायझेशन ही प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करण्यात आली. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा गौरव करून जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर, सर्व मतदार नोंदणी अधिकारी तसेच निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सत्कार करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये वसमत विधानसभा मतदारसंघातील टी. टी. जंगले, मुंजाजी असोले, सुरेश जाधव, कळमनुरी मतदारसंघातील एस. डी. लोंढे तसेच हिंगोली मतदारसंघातील जी. एन. वानखेडे, श्रीमती एस. के. चव्हाण, आर. जे. अंडीले, डी. एम. गडदे, पी. यू. राजपूत आणि ए. एस. धुमाळ यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती प्रगती चोंडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शेतकरी कर्जमुक्तीसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य- गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

राज्य शासनाने ही योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या व ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार असून, पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे.

यापूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांची मर्यादा शासनाने रद्द केली असून, अशा शेतकऱ्यांनाही आता दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.

दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार असून, उर्वरित रक्कम 'एक रक्कमी सम झोता' योजनेअंतर्गत भरता येणार आहे. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. राष्ट्रीयीकृत, व्यापारी, खासगी तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माहितीच्या आधारे राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे.

दरम्यान हिंगोली जिल्ह्यातील व्यापारी, खासगी, राष्ट्रीयीकृत तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील संभाव्य थकीत पीक कर्ज खात्यांचा डेटा कर्जमाफी पोर्टलवर अपलोड करण्याचे काम राज्यस्तरावर पूर्ण झाले असून, पुढील अंतिम कार्यवाही सुरू आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात येणार आहे.

# भूकंप आपत्ती व्यवस्थापनासाठी सीबीआरआयच्या सहकार्याने उपाययोजना करणार- राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**

जिल्ह्यात वारंवार जाणवणाऱ्या भूकंपाच्या धक्क्यांच्या पार्श्वभूमीवर भूकंप आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १३) जिल्हाधिकारी कार्यालयात मध्यवर्ती इमारत संशोधन संस्था, रुरकी (सीबीआरआय), उत्तराखंड यांच्या समवेत दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, सीबीआरआयचे संचालक प्रा. प्रदीप कुमार रामचंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठातील भूगर्भशास्त्र विभागाचे प्राध्यापक व भूकंपतज्ञ डॉ. टी. विजय कुमार, अजय चौरसिया तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी सीबीआरआयच्या संचालकांनी इमारतींचे भूकंपरोधक मजबुतीकरण, जुन्या इमारतींचे संरचनात्मक बळकटीकरण (रेट्रोफिटिंग) तसेच भूकंपसुरक्षित बांधकाम याविषयी सादरीकरण करून आवश्यक तांत्रिक माहिती दिली.

यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी भूकंप आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने विविध विभागांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. सीबीआरआयच्या तज्ज्ञांचे पथक हिंगोली जिल्ह्यात भेट देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून त्यांचे विशेष दौरे आयोजित करावेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अधिकारी, अभियंते आणि संबंधित यंत्रणांसाठी भूकंपसुरक्षित इमारत बांधकाम व सुरक्षिततेबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

याशिवाय सीबीआरआयच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अन्य शासकीय इमारतींच्या रेट्रोफिटिंगसाठी आवश्यक अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी संबंधित विभागांना दिल्या. या बैठकीदरम्यान डॉ. टी. विजय कुमार यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना उत्तराखंड येथील सीबीआरआय संस्थेला भेट देण्याचे निमंत्रण दिले. बैठकीस जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार मानून बैठकीची सांगता करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त

### पोलिस अधीक्षकांची औंढा ठाण्याला भेट



हिंगोली- जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. श्रेणिक लोढा यांनी औंढा नागनाथ पोलीस ठाण्याला मंगळवार (ता.१४) रोजी दुपारी दोन वाजता भेट दिली. यावेळी त्यांनी औंढा नागनाथ येथील पोलीस ठाण्याची माहिती घेतली तसेच आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस महापूजा करून दर्शन घेतले व हेमाडपंथी नागनाथ मंदिरावरील दगडी शिल्पाची माहिती जाणून घेतली. तसेच आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसराची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी देवस्थानच्यावतीने पोलीस अधीक्षक डॉ. श्रेणिक लोढा यांचा नागनाथ मंदिराची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे,देवस्थानचे वैजनाथ पवार, सुरेंद्र डफळ, कृष्णा पाटील, जमादार अमोल चव्हाण, संतोष पवार, ज्ञानेश्वर सावळे, पुरोहित, अभिषेक लोखंडे, महेश जोशी, पत्रकार दत्तात्रय शेगुकर, बसवेश्वर स्वामी राम प्रसाद उदगीरे, दशरथ राठोड उपस्थित होते.

### मसोड शिवारात युवकाचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला



हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील मसोड फाट्याजवळील शिवारात प्रवीण विश्वनाथ कुऱ्हे वय २४ या तरूणाचा मृतदेह लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत सापडला असून घटनेची माहीती मिळताच कळमनुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जमीर नाईक यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. फॉरेन्सिक टीमलाही पाचारण करण्यात आले होते. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेवून उत्तरीय तपासणीसाठी कळमनुरी उपजिल्हा रूग्णालयात दाखल केला आहे. अद्याप मृत्यूचे कारण स्पष्ट झाले नाही. याप्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात प्रथम आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून उत्तरीय तपासणीनंतरच मृत्युचे कारण स्पष्ट होणार आहे. या मृत्यूबद्दल उलटसुलट चर्चेला उधाण आले असून घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर बघ्यांची गर्दी जमली होती. पुढील तपास जमादार देवकर हे करीत आहेत. मयत युवकाच्या पश्चात आई-वडील आणि दोन बहिणी असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# आज हिंगोलीत भव्य रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**

जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि युवाशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी हिंगोली येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी सहभागी व्हावे, यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, अध्यक्ष आणि सचिव यांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी शिक्षणाधिकारी विपुल भागवत तसेच कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त बालाजी मरे उपस्थित होते.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील २० हून अधिक नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून, विविध पदांसाठी २ हजारांहून अधिक रिक्त पदे उपलब्ध असतील. दहावी, बारावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा, अभियांत्रिकी, सर्व शाखांतील पदवीधर, सीएनसी ऑपरेटर, सिपेट तसेच इतर पात्र उमेदवारांसाठी रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उमेदवारांसाठी वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे असून, निवड झालेल्या उमेदवारांना साधारणतः १५ हजार ते ३० हजार रुपये मासिक वेतन अथवा विद्यावेतन मिळण्याची संधी आहे. तसेच संबंधित कंपन्यांकडून जेवण, चहा-नाश्ता, बस सुविधा, आठ तासांची ड्युटी तसेच ओव्हरटाईमची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

हा रोजगार मेळावा कै. शिवाजीराव देशमुख सभागृह, रामलीला मैदानाशेजारी, हिंगोली येथे बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी गुप्ता यांनी जिल्ह्यातील सर्व युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन आपल्या करिअरला नवी दिशा द्यावी, असे आवाहन केले आहे. इच्छुक उमेदवारांनी उपलब्ध क्यूआर कोड स्कॅन करून त्वरित नोंदणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी महाविद्यालयांनी गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांसाठी एम्स, नीट, आयआयटी, सीए आदी स्पर्धात्मक अभ्यासक्रमांसाठी विशेष मार्गदर्शन व लक्ष्याधारित उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक महाविद्यालयातून किमान एक विद्यार्थी या अभ्यासक्रमांसाठी निवडला जाईल, यासाठी प्रयत्न करावेत. तसेच प्रत्येक महाविद्यालयातून तीन गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# लिंगायत स्मशानभूमीतील कोसळलेला हायमास्ट दोन महिन्यापासून जागेवरच

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १४ जुलै**

नगर परिषद हद्दीतील लिंगायत स्मशानभूमी परिसरात बसविण्यात आलेला हायमास्ट दिव्याचा खांब चक्री वाऱ्यामुळे कोसळून दीड ते दोन महिने उलटले आहेत. मात्र आजपर्यंत तो पूर्ववत उभारण्यात आलेला नसल्याने नगर परिषद प्रशासनाच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

याचबरोबर शहरातील विविध भागांत कोट्यावधी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेले अनेक हायमास्ट दिवेही अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याची नागरिकांकडून बोलले जात आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या या सुविधांची नियमित देखभाल होत नसल्याने शहरातील प्रकाश व्यवस्था प्रभावित होत आहे.

नगर परिषदेच्या विभागाकडे हायमास्टची उभारणी, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी असते. मात्र, लिंगायत शमशान भूमीतील कोसळलेला हायमास्ट दिव्या दीड ते दोन महिने तसाच पडून राहणे आणि शहरातील अनेक हायमास्ट दिवे बंद असणे, हे अभियांत्रिकी विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. नगर परिषदेकडून हायमास्टच्या देखभालीसाठी निधी उपलब्ध होत असेल, तर नियमित तपासणी व दुरुस्ती का? केली जात नाही? बंद पडलेले हायमास्ट दिवे त्वरित सुरू का केले जात नाहीत? तसेच कोसळलेला हायमास्ट उभारण्यास एवढा विलंब का होत आहे? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

लिंगायत स्मशानभूमीतील कोसळलेला हायमास्ट तातडीने उभारण्यात यावा, शहरातील सर्व बंद हायमास्ट दिवे सुरू करावेत आणि या प्रकरणातील हलगर्जीपणाबाबत अभियांत्रिकी विभागाची जबाबदारी निश्चित करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# भट्ट कॉलनीतील वीज समस्या तत्काळ सोडविण्याचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**

शहरातील भट्ट कॉलनी परिसरात मागील काही दिवसांपासून वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे त्रस्त झालेल्या परिसरातील नागरिकांनी भाजपा नेते आमदार तान्हाजी मुटकुळे यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या. या तक्रारीची दखल घेत आमदार मुटकुळे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना भट्ट कॉलनीतील वीज समस्या तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले आहेत.

भट्ट कॉलनी परिसरातील वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना, विशेषतः लहान मुले व वृद्धांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नागरिकांनी आमदारांकडे धाव घेतली. यावर आमदार मुटकुळे यांनी संबंधित महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या भागातील प्रमुख अडचणी जाणून घेतल्या. हा बिघाड नेमका कशामुळे होत आहे, याचा शोध घेऊन तिथे नवीन रोहित्र किंवा इतर तांत्रिक सुधारणा काय कराव्या लागतील, याचा आराखडा तात्काळ तयार करण्यास त्यांनी सांगितले. तसेच, या कामासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, गरज पडल्यास जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी दिली. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जगजीतराज खुराणा,के,के शिंदे,पत्रकार राकेश भट्ट,भाजपा प्रवक्ता विलास गोरे, पप्पू भट्ट, गोल्डी सोनी, नितीन जैस्वाल, नगरसेवक हमीद प्यारेवाले, बाबाराव घुगे, रजनीश पुरोहीत, पवन उपाध्ये, समिर भिसे उपस्थित होते,